

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २५९। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शनिवार २४/१०/२०२६ । पाने- ६



कथित ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक चौकशी - मुख्यमंत्री



नागपूर (वृत्तसंस्था)

राज्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडींवर सविस्तर भाष्य करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे की, मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक चौकशी केली जाईल, अशी ग्वाही दिली. तसेच, पुण्यात भाजपकडून 'स्पाय पेन'चा वापर होत असल्याच्या आरोपांवरून त्यांनी सुप्रिया सुळे यांना टोला लगावला.

मनोज जरांगे यांच्या ऑडिओ क्लिपबाबत विचारलेल्या प्रश्नावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, काल शिवसेना (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ मला भेटले. समोर आलेल्या ऑडिओ क्लिपची किंवा संभाषणाची पूर्णपणे फॉरेन्सिक चौकशी होईल, असे मी त्यांना आश्वासित केले आहे. अडीच वर्षांनंतर हे संभाषण आत्ताच बाहेर येण्यामागे नेमका हेतू काय आहे आणि कोणाला टार्गेट केले जात आहे, असे अनेक प्रश्न आहेत. मनोज जरांगे, शिवसेनेचे शिष्टमंडळ आणि भाजपनेही या चौकशीची मागणी केली आहे.

त्यामुळे फॉरेन्सिक चौकशीतून याचे जे काही सत्य आहे, ते आम्ही बाहेर काढू. ५०० कोटींच्या आरोपांवरून भाजपची बदनामी होत आहे का, यावर मात्र त्यांनी अधिक बोलणे टाळले. पुणे पदवीधर निवडणुकीत भाजपकडून मतदारांना पैसे वाटण्यासाठी 'स्पाय पेन'चा वापर केला जात असल्याचा आरोप विरोधकांनीकेला होता. या आरोपावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, स्पाय पेन म्हणजे नेमके काय आणि तो कसा असतो, (पान ६)

हिवरगाव पठार-साकूर रस्त्याचा प्रश्न मार्गी

आ. खताळ यांच्या पाठपुराव्याला यश, रस्त्यासाठी साडेतीन कोटी मंजूर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते विकासाला चालना मिळणार आहे. हिवरगाव पठार ते साकूर या सुमारे चार किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या सुधारणा कामासाठी केंद्रीय रस्ते आणि पायाभूत सुविधा निधी (सीआरआयएफ) अंतर्गत तीन कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आमदार अमोल खताळ यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून हा निधी उपलब्ध झाला आहे. अशी माहिती आमदार खताळ यांनी दिली.

याबाबत माहिती देताना आमदार खताळ म्हणाले की, हिवरगाव पठार ते साकूर हा रस्ता परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या रस्त्याची सुधारणा व्हावी आणि नागरिकांची गैरसोय दूर व्हावी, यासाठी आपण प्रयत्नशील होतो. याच अनुषंगाने नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन या रस्त्याच्या कामासाठी केंद्रीय रस्ते आणि पायाभूत सुविधा निधीतून आर्थिक तरतूद करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली होती. या मागणीचा पाठपुरावा केल्यानंतर रस्त्याच्या सुधारणा कामासाठी तीन कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

ग्रामीण भागातील रस्ते हे गावांना जोडणारे आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेले महत्त्वाचे माध्यम आहे. रस्त्यांची चांगली सुविधा उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक करणे, विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयांत जाणे तसेच नागरिकांना विविध कामांसाठी प्रवास करणे अधिक सुलभ होते. त्यामुळे हिवरगाव पठार-साकूर रस्त्याच्या सुधारणा कामामुळे परिसरातील दळणवळणाला मदत होणार आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी उपलब्ध होत आहे. यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा देखील करत आहे.

दरम्यान, या रस्त्याच्या सुधारणा कामासाठी तीन कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, नागरिकांनी आमदार अमोल खताळ यांचे आभार मानले आहेत. तर या निधीच्या मंजुरीबद्दल आमदार अमोल खताळ यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले तसेच महायुती सरकारचे आभार मानले आहेत.

दुष्काळाची दाहकता १९७२ साला पेक्षा जास्त

महाराष्ट्र सरकार पुढे अनेक आव्हाने



मित्रांनो, दिवाळीचे दिवस जवळ आले आहेत, पण या दिवाळीनंतर एक काळाकुट्ट अंधार दाटून येतोय. ही दिवाळी आपण आनंदात साजरी करू, पण त्यानंतरचा प्रत्येक दिवस संकटाचा आणि अडचणीचा असणार आहे, हे लक्षात ठेवा. दिवाळीनंतर महाराष्ट्राची चाके थांबणार आहेत. मी तुम्हाला घाबरवत नाहीये, तर जागे करतोय. कारण अल निनोच्या कोरड्या दुष्काळाचे हे संकट छोटे नाही, ते अफाट आहे. आणि आपल्या लोकांच्या हे अजूनही लक्षात येत नाही, हेच आपले दुर्दैव आहे. दुष्काळाची शिदोरी बांधण्याऐवजी, घरात धान्य-किराणा साठा भरण्याऐवजी आपण सण-उत्सवात, चैनीच्या वस्तू, वायफळ खर्च, फटाके खरेदी आणि डीजे, साऊंड, लेझर लाईटच्या धांगडधिंग्यात रमलो आहोत. किती वाईट आणि लाजिरवाणे हे जगणे आहे. अल निनोच्या महाभयंकर संकटाला तुम्ही हलक्यात घेत आहात, हेच दुर्दैव आहे. म्हणून आज मी थेट, रोखठोक आणि काळजाला घरं पाडणारे सत्य मांडतोय.

ज्यांनी १९७२ चा दुष्काळ पाहिला आहे, त्यांच्या अंगावर आजही काटा येतो. आईने पोटच्या गोळ्याला विकल्याच्या, पाण्यासाठी माणसांनी वणवण भटकल्याच्या, (पान २ वर)



अकोल्यात महा मुक्काम सत्याग्रहाला पाठिंब्यासाठी हजारोंचा मोर्चा

पाच हजारांची मदत म्हणजे शेतकऱ्यांची चेष्टा'; किसान सभेचा सरकारला इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत द्या, पीकविम्याची नुकसानभरपाई तातडीने द्या, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांची कर्जमाफी द्या आणि कसणाऱ्यांच्या नावे जमिनी करा, लाडक्या बहिणींचे बंद केलेले मानधन पुन्हा सुरू करा, अशा मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभा, सेंटर फॉर इंडियन ट्रेड युनियन (सीटू), अखिल भारतीय जनवादी महिला संघटना आणि डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या नेतृत्वाखाली अकोले येथे गुरुवारी सात हजार शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि महिलांचा विराट मोर्चा काढण्यात आला.

लाल-पांढरे झेंडे हातात घेऊन हजारोंच्या संख्येने सहभागी झालेल्या आंदोलकांनी अकोले शहरातील प्रमुख रस्त्यावरून जोरदार घोषणा देत तहसील कार्यालयावर धडक दिली. त्यानंतर तहसील कार्यालयाबाहेर झालेल्या भव्य जाहीर सभेत सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांवर जोरदार टीका करण्यात आली. या मोर्चाला ज्येष्ठ नेत्या वृंदा करात, अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक धवळे आणि राष्ट्रीय संयुक्त सचिव डॉ. अजित नवले यांनी संबोधित केले. किसान सभेचे राज्य कोषाध्यक्ष सदाशिव साबळे, राज्य सहसचिव नामदेव भांगरे, कौन्सिल सदस्य ताराचंद विधे, तसेच एकनाथ मेंगाळ, गणेश ताजने, संगीता साळवे, हेमलता शेळके, निर्मला मांगे, मथुराबाई बर्डे, शिवराम लहामटे, राजू गंभीरे, दत्ता गोंदके यांनीही आपले विचार मांडले.

महाराष्ट्रातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता राज्य सरकारने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची मदत अत्यंत तुटपुंजी (पान ४ वर)







माणसांची तहान भागतेय; मुक्या जनावरांना पाणी कुठून आणायचे?

हिवरगाव पठारातील आदिवासी वाड्यांमध्ये दुष्काळाच्या झळा तीव्र; पशुधनासाठी स्वतंत्र टँकरची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दुष्काळाच्या झळांनी होरपळणाऱ्या संगमनेर तालुक्यात माणसांची तहान भागविण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असला, तरी मुक्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. एकीकडे माणसांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविताना दुसरीकडे पशुधनाची तहान भागवायची कशी, असा यक्षप्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. त्यामुळे जनावरांसाठी स्वतंत्र टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी हिवरगाव पठार गावांतर्गत असलेल्या दगडसोंडवाडीचे ग्रामपंचायत सदस्य रामदास गोंदके यांनी अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांच्याकडे केली आहे.



दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी गुरुवारी (ता. २२) दुपारी हिवरगाव पठार येथील गिन्हेवाडी आणि दगडसोंडवाडी या आदिवासी वाड्यांना भेट दिली. भरदुपारचे कडक ऊन, पाण्यासाठी करावी लागणारी धावपळ आणि दुष्काळामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा सामना करणाऱ्या ग्रामस्थांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्याची पाहणी करून ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या.

सध्या टँकरद्वारे मिळणारे पाणी ग्रामस्थांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठीच पुरत आहे. अशा परिस्थितीत जनावरांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देणे पशुपालकांसमोर मोठे आव्हान बनले आहे. जनावरे ही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मोठी संपत्ती असून, दुष्काळात त्यांचे संगोपन करणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. त्यामुळे माणसांप्रमाणेच पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी भूमिका रामदास गोंदके यांनी मांडली. जनावरांची तहान भागविण्यासाठी स्वतंत्र पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्याची मागणीही त्यांनी केली.

दुष्काळाचा परिणाम केवळ पाणीपुरवठ्यावरच नव्हे, तर पशुधनाच्या चाऱ्यावरही झाला आहे. परिसरात हिरवा चारा उपलब्ध नसून, सध्या केवळ वाळलेला चारा शिल्लक आहे. हा चारा जेमतेम महिनाभर पुरेल, अशी परिस्थिती असल्याची माहिती पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. उदय वाळुंज यांनी दिली. त्यामुळे पाणीटंचाईसोबतच चारा टंचाईचे संकटही पशुपालकांसमोर उभे राहण्याची शक्यता आहे.

पाहणीदरम्यान अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून पाणीपुरवठ्याची माहिती घेतली. पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच परिसरातील पशुधनाची संख्या, जनावरांसाठी उपलब्ध असलेला चारा आणि तो किती दिवस पुरू शकतो, याचीही माहिती घेतली. दुष्काळामुळे माणसांसह जनावरांनाही पाणी आणि चाऱ्याच्या टंचाईचा सामना करावा लागत असल्याने या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्याची गरज यावेळी अधोरेखित झाली. या पाहणीप्रसंगी मंडळ अधिकारी अनिल आव्हाड, तलाठी संतोष घोळवे, सहायक कृषी अधिकारी संकेत देशमुख, ग्रामविकास अधिकारी व्ही. एम. घुले, ग्रामपंचायत सदस्य रामदास गोंदके, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. उदय वाळुंज, महसूल सेवक आसिफ शेख आदी उपस्थित होते.

दुष्काळात माणसांची तहान भागविण्यासाठी टँकर धावत असले, तरी मुक्या जनावरांच्या पाण्याचा प्रश्न अद्याप कायम आहे. आता प्रशासन या मागणीची दखल घेऊन पशुधनासाठी स्वतंत्र पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणार का, याकडे हिवरगाव पठार परिसरातील ग्रामस्थ आणि पशुपालकांचे लक्ष लागले आहे.

'जलजीवन'च्या कामात पारदर्शकता ठेवा

सीईओ भंडारी संगमनेर पंचायत समितीत आढावा बैठक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जलजीवन योजनेच्या कामकाजात पारदर्शकता ठेवण्याची आणि गावातील नागरिकांना कामांची सद्यस्थिती, निधी, प्रगती, येणाऱ्या अडचणींबाबत माहिती द्या. 'जलजीवन योजनेच्या कामाबद्दल लोकांना अंधारात ठेवू नका; त्यात आपली बदनामी होत आहे, अशा स्पष्ट शब्दांत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी अधिकाऱ्यांची कान उघाडणी केली.



संगमनेर पंचायत समिती येथे सीईओ भंडारी यांच्या उपस्थितीत गुरूवारी (दि.२२) विविध विकासकामांसह जलजीवन मिशन योजनेच्या कामांचा आढावा घेण्यासाठी बैठक संपन्न झाली. या बैठकीला पंचायत समितीचे गट विकास अधिकारी प्रवीण सिनारे, सरपंच, जलजीवन प्राधिकरणाचे अधिकारी, पंचायत समिती अधिकारी, कर्मचारी व तालुक्यातील सुमारे ९० सरपंच व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे नियमित आणि पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जलजीवन मिशन राबविण्यात येत आहे. मात्र, योजनेची कामे सुरू असताना

ग्रामस्थांना प्रत्यक्ष कामाची स्थिती, काम पूर्ण होण्याचा कालावधी आणि निर्माण झालेल्या अडचणीं बाबत योग्य माहिती मिळणे आवश्यक आहे. योजनेच्या कामकाजात माहितीचा अभाव राहिल्यास ग्रामस्थांमध्ये संभ्रम निर्माण होतो आणि प्रशासनाविषयी नाराजी वाढते. या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायती, सरपंच आणि ग्रामस्थ यांच्याशी समन्वय ठेवून कामांची वस्तुस्थिती स्पष्ट करावी, कामांच्या प्रगतीची माहिती द्यावी आणि तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये, अशा सूचनाही भंडारी यांनी केल्या.

दरम्यान, जलजीवन मिशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्याची अपेक्षा आहे. मात्र, योजनेची कामे प्रत्यक्षात दर्जेदार आणि वेळेत पूर्ण होणे नागरिकांना नियमित पाणीपुरवठ मिळणे आणि योजनांच्या अंमलबजावणीत जबाबदारी निश्चित होणे तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ कामांची नोंद किंवा कागदोपत्री पूर्तता न करता त्याचा लाभ ग्रामस्थांना प्रत्यक्ष मिळतो की नाही, याची जीवन प्राधिकरण विभागाचे अधिकारी यांनी खातर जमा करून घ्यावी, अशा सूचना भंडारी यांनी दिल्या.

संगमनेरमध्ये शासकीय अतिक्रमणांवर कारवाईचे संकेत !

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर

संगमनेर नगरपालिका हद्दीतील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या शासकीय जागेवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाल्याचा प्रकार समोर आला असून, आता या प्रकरणी महसूल विभाग आणि नगरपरिषद प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले आहे. बीएसएनएल कार्यालयाशेजारी आणि पोलीस कॉलनीसमोरील अतिक्रमण हटवण्यासाठी तक्रार अर्ज दाखल झाल्यानंतर प्रांताधिकारी अरुण उंडे यांच्यासह नगरपालिका प्रशासनाने कारवाईचा बडगाः उगारण्यास सुरुवात केली आहे.

शासकीय भूखंडावर झालेल्या अतिक्रमण संदर्भात शहरातील काही सुज्ञ नागरिकांनी दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रांताधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. या अर्जात नमूद केल्यानुसार, सदर ८६/४१ हा प्लॉट जिल्हाधिकारी यांच्या नावे असून तो तहसीलदार, तलाठी आणि कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी राखीव आहे. सोबतच या जागेवर प्ले ग्राउंड, प्रायमरी स्कूल, मॅटर्निटी होम, हायस्कूल आणि म्युनिसिपालटी मार्केट यासारखी नगरपरिषदेची महत्त्वपूर्ण आरक्षणे आहेत. असे असतानाही या जागेवर बेकायदेशीरपणे दुकाने थाटून आणि बांधकामे करून अतिक्रमण करण्यात आले आहे. तक्रारदारांच्या या अर्जाची गंभीर दखल घेत उपविभागीय अधिकारी कार्यालयाने दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी तहसीलदार आणि संगमनेर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती समोर येत आहे.

मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी संगमनेर बुद्रुकच्या तलाठी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांना पत्र पाठवून जागेची अचूक हद्द व प्रत्यक्ष ताब्याची माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या पत्रात ०.३५.०० हेक्टर आर क्षेत्र असलेल्या या जागेचा ७/१२ उतारा, फेरफार नोंदी, भूमि अभिलेख कार्यालयाकडूनह प्रत्यक्ष मोजणी नकाशा आणि अतिक्रमणाबाबत पूर्वी दिलेल्या नोटीसांची सविस्तर माहिती मागवण्यात आली आहे.

५०० कोटी कुठे गेले ? - खा. संजय राऊत

आता शिक्षक आणि पदवीधरांनाही १० हजारांचे वाटप ?

मुंबई (वृत्तसंस्था)

विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघासाठी आज राज्यात मतदान होत आहे. या निवडणुकीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या निवडणुकीत महायुतीची सरशी होणार की महाविकास आघाडीची? याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलेलं आहे. राज्यात निवडणुकीची लगबग सुरू असतानाच ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठा बॉम्ब फोडला आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत भाजपने मतदारांना प्रत्येकी १०-१० हजार रुपयांचं वाटप केलं आहे, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. राऊत यांच्या या आरोपांनी एकच खळबळ उडाली आहे. काल मनोज जरांगे यांनी मोठा बॉम्ब फोडल्यानंतर आता संजय राऊत यांनीही मीडियाशी बोलताना मोठा आरोप केल्याने खळबळ उडाली आहे.



मनोज जरांगे यांनी ५०० कोटी रुपयांचा गौप्यस्फोट केला आहे. यातून एक स्पष्ट होतंय. शिंदे आणि फडणवीस हे एकमेकांवर तलवार चालवत आहे. यातून एका दगडात तीन पक्षी मारले आहेत. जरांगेंना बदनाम करायचं आणि फडणवीस आणि शिंदेंना गोत्यात आणायचं हा यामागचा हेतू आहे. ज्याने ऑडिओ क्लिप काढली त्याला माहीत आहे, मी तर मरणार आहे. पण तुला साथ घेऊन बुडणार. अशा पद्धतीचा हा खेळ सुरू आहे. दुष्काळावर कोणी बोलत नाही. पदवीधरांचे मत १० हजाराला विकत घेतलं जात आहे.

मतदारांना प्रत्येकी १०-१० हजार रुपये देण्यात आले आहेत. भाजपने हे दिले आहेत. पण शेतकऱ्यांना फक्त ५ हजार रुपये दिले जात आहेत. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघात काल परवापासून प्रत्येकी १० हजार रुपये वाटले जात आहेत. भाजपचे उमेदवार आहे, तिथे हे वाटप होत आहे, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.जे ५०० कोटी जमा झाले आहेत, त्यातून मतं विकत घेणं, पक्ष विकत घेणं सुरू आहे. जरांगेंचं आंदोलन संपवण्यासाठी हा खेळ सुरू झाला आहे, असा दावाही राऊत यांनी केला आहे. आपण पैशाने सर्व काही विकत घेऊ शकतो. पक्ष, आमदार खासदार आणि माणसंही, असं सत्ताधाऱ्यांना वाटत आहे. भाजप आणि शिंदे गटाकडे हा भ्रष्टाचाराचा पैसा आहे. आम्ही आंदोलन केलं तर आम्हाला देशद्रोही ठरवलं जातं. आम्हाला चिरडलं जातं. आम्हाला तुरुंगात टाकलं जातं. त्यावर आम्ही बोलायचं नाही? असा सवाल संजय राऊत यांनी केला आहे .लीच्या बीकानेर हाऊसमधील प्रदर्शनातून काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांचे चिरंजीव रेहान वाड्रा यांनी काढलेले फोटो हटवण्यात आले आहेत. त्यावरही राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सरकार आंदोलनाला घाबरतंय. आता आंदोलनाच्या फोटोलाही सरकार घाबरत आहे. ही हिटलर टाइप सेन्सॉरशीप आहे. रेहान याने काही आंदोलनातील रिॲक्शन त्याच्या कॅमेऱ्यात टिपल्या आहेत. अत्याचाराच्या आणि वेदनेच्या या रिॲक्शन आहेत. ही कला आहे. जगात युद्ध झाले,. वर्ग कलह झाले. धार्मिक कलह झाले, त्या प्रत्येक ठिकाणी फोटोग्राफर पोहोचले होते. त्यांनी त्याचे फोटो काढले होते. अगदी गाजापट्टीतही फोटो काढून त्याचं प्रदर्शन भरवलं गेलंय. पण मोदी आणि शाह हे डरपोक हुकूमशाह आहेत.

स्ट्रॉबेरी इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये कन्यापूजन सोहळा भक्तिमय वातावरणात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- श्री व्यंकटेश एज्युकेशन सोसायटी संचलित स्ट्रॉबेरी इंग्लिश मिडियम स्कूल, संगमनेर येथे नवरात्रोत्सवानिमित्त कन्यापूजन सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात करण्यात आले. भारतीय संस्कृतीतील स्त्रीशक्तीचा सन्मान, कन्येचे महत्त्व आणि नवदुर्गेच्या उपासनेचा संदेश देणारा हा सोहळा अत्यंत मंगलमय वातावरणात पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. व सौ. नागरे आणि श्री. चंद्रकांत कानडे उपस्थित होते. तसेच संस्थेच्या अध्यक्षा डॉ. संज्योत वैद्य मॅम यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेतील चिमुकल्या मुलींनी धारण केलेले नवदुर्गेचे मनमोहक रूप. या बालिकांना विविध दुर्गारूपांमध्ये सुंदर वेशभूषा करण्यात आली होती. पारंपरिक पोशाख, आकर्षक सजावट आणि निरागस भावमुद्रांमुळे या चिमुकल्या बालिका जणू साक्षात नवदुर्गेचे रूपच भासत होत्या. त्यांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण कार्यक्रमाला एक वेगळीच शोभा आणि आध्यात्मिक उंची प्राप्त झाली.

या सोहळ्यात कन्यांना नवदुर्गेचे प्रतीक मानून त्यांचे विधिवत पूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कन्यांचे पादप्रक्षालन करून त्यांना हळद-कुंकू लावण्यात आले आणि त्यांचा सन्मान करण्यात आला. या पारंपरिक विधीतून कन्येतील दैवी शक्तीचा गौरव करत स्त्रीशक्तीप्रती आदर, श्रद्धा आणि कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

नवरात्रोत्सव हा शक्ती, भक्ती आणि सकारात्मक ऊर्जेचा उत्सव मानला जातो. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या कन्यापूजन सोहळ्याने विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील समृद्ध परंपरांचा अनुभव घेण्याची संधी दिली. तसेच मुलींप्रती आदरभाव, समानतेची जाणीव आणि संस्कारमूल्ये जपण्याचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी श्री. नागरे यांच्यातर्फे सर्व विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. अशा सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये भारतीय परंपरांविषयी अभिमान, सामाजिक मूल्यांची जाणीव आणि संस्कारांची रुजवण करण्याचा शाळेचा प्रयत्न कौतुकास्पद ठरला.

पान १ वरून

दुष्काळाची दाहकता

नजनावरांनी तडफडून प्राण सोडल्याच्या कहाण्या आपण ऐकल्या. पण मित्रांनो, यंदाचा दुष्काळ त्या १९७२ पेक्षाही कितीतरी पटीने भयंकर असणार आहे. १९७२ ला निदान पाऊस अधून-मधून हजेरी लावत होता. यावेळी परिस्थिती वेगळी आहे. पावसाळ्याच्या चारही महिन्यांनी आपल्याला धोका दिला. हा ओला दुष्काळ नाही, हा निखळ कोरडा दुष्काळ आहे. नक्षत्रं कोरडी गेली. पेरण्या झाल्या, पण बियाणं मातीतच जळून गेलं. जमिनीत ओलावा नाही. विहिरींनी तळ गाठला आहे, बोअरवेल कोरड्या ठाक पडल्या आहेत आणि मोठमोठ्या धरणात केवळ गाळ आणि भेगा उरल्या आहेत. हे निसर्गाचे चक्र नाही, हा अल निनोचा थेट घाला आहे. प्रशांत महासागरात वाढलेल्या तापमानाने आपला मान्सूनच पळवून नेला आहे. हवामान तज्ज्ञ ओरडून सांगत होते, पण आपण सण-उत्सवात मशगुल होतो.

आता या दुष्काळाची साखळी कशी एकमेकांना विळखा घालणार आहे, ते समजून घ्या.

१. पाणी टंचाईचा पहिला तडाखा : राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील धरणे आता पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करण्यात आली आहेत. गावागावात शासनाने पाणी पुरवठ्यात कपात केली आहे. अनेक ठिकाणी आजपासूनच टँकरने पाणीपुरवठा सुरु झाला आहे. दिवाळीनंतर हेच चित्र शहरात दिसणार आहे. नळाला थेंबही येणार नाही. एका हंडाभर पाण्यासाठी महिला भगिनींना रात्र-रात्र जागून काढावी लागेल. पाण्यावरून वाद, भांडणे आणि हाणामाऱ्या होतील. कारण पाणी म्हणजे जीवन, आणि तेच जीवन आपल्या हातातून निसटत चालले आहे.

२. रोजगारावर दुसरा घाला : अल निनोच्या दुष्काळाने रोजगारावर घाला घातला आहे. शेतात पीकच नाही, तर शेतमजुराला काम कोण देणार? शेतात मजूर नाहीत तर शेतमजूर जाणार कुठे? लाखो हात बेरोजगार होणार आहेत. रोजंदारीवर पोट भरणारा वर्ग उघड्यावर येणार आहे. शहरात पाणी नसल्याने बांधकामे बंद पडतील. कंपन्यांचे उत्पादन घटेल. गावात काम नाही म्हणून तरुण शहरात धाव घेतील आणि शहरातही काम मिळणार नाही. ही अशी दुहेरी कोंडी आहे, जी संपूर्ण पिढीला नैराश्याच्या खाईत लोटेल. ३. अन्न टंचाई आणि महागाईचा तिसरा महास्फोट : दुष्काळामुळे अन्न टंचाई आणि महागाई अगडबंब वाढणार हे स्पष्ट आहे. आजच डाळी व कडधान्याचे भाव वाढले आहेत. शेतात धान्य नाही, तर बाजारात येणार कोठून? अन्न-धान्याची मागणी तेवढीच, पण पुरवठा शून्य. याचा सरळ अर्थ आहे - महागाईचा स्फोट. जी तूरडाळ आज १५० ते २०० रुपयांना आहे, ती उद्या ३५० रुपये होईल. तेल, साखर, भाजीपाला सामान्यांच्या आवाक्याबाहेर जाईल. अशी वेळ येईल की खिशात पैसा असेल, पण दुकानात धान्य नसेल. लक्षात ठेवा, दुष्काळात पैशाची किंमत शून्य असते, किंमत असते ती फक्त भाकरीला.

म्हणूनच हात जोडून विनंती - चैन थांबवा, बचत करा

म्हणूनच मी तुम्हाला कळकळीने सांगतोय, या दिवाळीत वायफळ खर्चाला पूर्ण लगाम घाला. सण साजरा करा, पण दिखावा नको. या वर्षी चैनीच्या वस्तू - महागडा मोबाईल, मोठा टीव्ही, नवीन फ्रीज, कुलर घेण्याची अजिबात गरज नाही. नवीन कपड्यांची हौस बाजूला ठेवा, आहे त्याच कपड्यात दिवाळी साजरी होते. घराची रंगरंगोटी यंदा नाही केली तरी चालेल. तीर्थयात्रा, सहल, हॉटेलमधील पार्ट्या, बाहेरचे महागडे जेवण यावर अंकुश लावा. वाचवलेला प्रत्येक रुपया हा पुढचे आठ महिने तुमच्या कुटुंबाचा प्राण वाचवेल. प्रत्येक कुटुंबप्रमुखाने आजच एक निर्णय घ्या - पुढचे आठ महिने पुरेल एवढा किराणा आणि धान्य घरात भरून ठेवा. गहू, ज्वारी, तांदूळ, डाळ, तेल, मीठ, साखर. जे टिकाऊ आहे ते आजच घेऊन ठेवा. हे मी तुम्हाला घाबरवण्यासाठी नाही, तर काळाची पावले ओळखून सांगतोय. आज बाजारात वस्तू आहेत, उद्या पैसा असूनही मिळणार नाहीत.

आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, या काळात माणूस होऊन जगू या - आपल्या अवतीभवती असे अनेक बांधव आहेत ज्यांच्याकडे साठवणूक करायलाही पैसे नाहीत. गोरगरीब, वयोवृद्ध आई-बाप, निराधार महिला, दिव्यांग बांधव. त्यांच्याकडे कोण पाहणार? शासनाची मदत येईल तेव्हा येईल, पण तोवर आपणच एकमेकांचा आधार होऊया. तुमच्या घरात चार भाकरी असतील तर दोन भुकेल्या मुखाला द्या. तुमच्या घागरीत पाणी असेल तर तहानलेल्याला पाणी पाजा. तुम्ही पाजलेल्या पाण्यातून आणि भरवलेल्या घासातून मिळणारे आशीर्वादच आपल्याला या भयंकर दुष्काळातून वाचवतील. लक्षात ठेवा, दुष्काळ हा केवळ पावसाचा नसतो, तो माणुसकीचा सुद्धा असतो, तो आपण पडू देऊ नका. या भयंकर दिवसात दानशूर व्यक्ती, व्यापारी, उद्योगपती, राजकीय नेते आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन आपल्या गावात, धर्मादाय संस्था सभागृहात, ग्रामपंचायत सभागृहात, स्थानिक श्री हनुमान मंदिर, श्री जगदंबा मंदिर किंवा संत गजानन महाराज मंदिरात दुष्काळाचे दिवस निघून जाईपर्यंत सात-आठ महिने दररोज सदावर्त अन्नछत्र सुरु करून आपल्या गावातील गोरगरीब, मजूर, शेतमजूर, वयोवृद्ध, दिव्यांग, निराधारांची दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था करावी. ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी पाणपोई, गुरे-ढोरे जनावरांसाठी पाण्याचे हौद बांधावेत. आजारी व्यक्तीसाठी मोफत उपचाराची व्यवस्था करावी. मित्रांनो, घाबरायचं नाही, पण डोळे झाकूनही चालणार नाही. ही वेळ रडत बसण्याची नाही, तर लढण्याची आहे. दिवाळीचा आनंद घ्या, पण उद्याच्या कठीण दिवसाची तयारी आजच करा.

सावध व्हा... सतर्क रहा... बचत करा... आणि माणुसकी जपा...!

संजय मधुकरराव कडोळे,
ज्येष्ठ साहित्यीक, वाशिम

रामभाऊ शेटे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील नांदुरी दुमाला येथील ज्येष्ठ नागरिक रामभाऊ तुकाराम शेटे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्यावर नांदुरी दुमाला येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कै. रामभाऊ तुकाराम शेटे हे धार्मिक वृत्तीचे व मनमिळाऊ स्वभावाचे नागरिक होते. त्यांच्या पश्चात भाऊ, बहिणी, दोन मुले, चार मुली, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. रामभाऊ शेटे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

अकोले तालुक्यात अवैध दारूविक्रीचा सुळसुळाट

प्रांताधिकाऱ्यांचे कठोर निर्देश! बीट अंमलदार, पोलीस पाटलांची जबाबदारी निश्चित करा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- अकोले तालुक्यात अवैध दारूविक्रीचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढत असल्याने प्रशासनाच्या कारवाईवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर अवैध दारूविक्रीविरोधात पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्तपणे कठोर कारवाई करावी. तसेच संबंधित हद्दीतील बीट अंमलदार आणि पोलीस पाटील यांची जबाबदारी निश्चित करून त्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावाव्यात, असे महत्त्वपूर्ण निर्देश प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी तालुका दारूबंदी समितीच्या बैठकीत दिले.

अकोले तालुका दारूबंदी समितीच्या बैठकीत अवैध दारूविक्रीचा मुद्दा ऐरणीवर आला. राजूर परिसरात दारूविक्रेत्यांची संख्या वाढत असल्याने पोलिसांचे नियंत्रण नेमके कुठे आहे, असा सवाल अशासकीय सदस्य हेरंब कुलकर्णी यांनी उपस्थित केला. अवैध व्यवसायाला आळा घालण्यात अपयश येत असेल, तर संबंधित पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

अकोले शहरात पोलीस ठाणे असतानाही हाकेच्या अंतरावरील शाहूनगर परिसरात तसेच साखर कारखान्याच्या परिसरात दारूविक्री होत असल्याचा मुद्दा कुलकर्णी यांनी मांडला. तालुक्यात ज्या ठिकाणी अवैध दारूविक्री सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, अशा सुमारे २५ ठिकाणांची यादी त्यांनी प्रांताधिकारी उंडे



यांच्याकडे सादर केली. वीरगाव फाटा, देवठाण धरण, समशेरपूर फाटा आणि लहित परिसरातील काही हॉटेलमध्ये दारूविक्री होत असल्याचा आरोप करत संबंधित हॉटेलची परवानगी रद्द करण्याची मागणीही त्यांनी केली. अवैध दारूविक्रीला आळा घालण्यासाठी केवळ वरवरच्या कारवाया न करता, या व्यवसायाला आश्रय देणाऱ्या यंत्रणेचीही चौकशी व्हावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

संगमनेरच्या दिशेने अकोले तालुक्यात येणाऱ्या दारूच्या पुरवठ्याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे पुरेसे लक्ष देत नसल्याची तक्रारही बैठकीत करण्यात आली. त्यामुळे तालुक्यातील अवैध दारूविक्रीचे जाळे रोखण्यासाठी स्थानिक पातळीवरील कारवाईसोबतच दारूच्या पुरवठ्याच्या मार्गांवरही लक्ष केंद्रित करण्याची गरज अधोरेखित झाली.

बैठकीत प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध दारूविक्रीविरोधात करण्यात येणाऱ्या कारवाईची माहिती घेतली. सादर करण्यात आलेल्या गावांच्या यादीतील प्रत्येक ठिकाणी प्रत्यक्ष कारवाई करावी आणि पुढील महिन्यात होणाऱ्या बैठकीत गावनिहाय कारवाईचा सविस्तर अहवाल सादर करावा, असे स्पष्ट आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या बैठकीला तहसीलदार, दोन्ही पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक, गटविकास अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी तसेच अशासकीय सदस्य हेरंब कुलकर्णी उपस्थित होते.

आता प्रशासनाच्या या निर्देशांनंतर अवैध दारूविक्रीला खरोखर आळा बसतो का, संबंधित जबाबदार यंत्रणेवर कारवाई होते का आणि २५ ठिकाणांवरील तक्रारींचे काय होते, याकडे अकोले तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

निवडणूक आयोगात अंतर्गत वाद

दोन आयुक्तांची वरिष्ठ अधिकाऱ्याविरोधात तक्रार

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

भारतीय निवडणूक आयोगातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कामकाजावरून निर्माण झालेला अंतर्गत वाद माहितीच्या अधिकारातून (आरटीआय) समोर आला आहे. निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त मनीष गर्ग यांच्या विरोधात कॅबिनेट सचिवांकडे स्वतंत्र पत्राद्वारे तक्रारी केल्याची माहिती उघड झाली आहे. पूर्वपरवानगी किंवा संबंधित अधिकाऱ्यांशी सल्लामसलत न करता कामाच्या वाटपात बदल केल्याचा आरोप या तक्रारींमध्ये करण्यात आला होता.

माहिती अधिकार कार्यकर्ते आणि निवृत्त कमोडोर लोकेश के. बात्रा यांना मिळालेल्या कॅबिनेट सचिवालयाच्या उत्तरातून हा तपशील समोर आला आहे. मनीष गर्ग यांची नियुक्ती २ सप्टेंबर २०२४ रोजी मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीमार्फत करण्यात आली होती. त्यानंतर आयोगातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कामाच्या जबाबदाऱ्यांच्या फेरवाटपावरून मतभेद निर्माण झाल्याचे या पत्रव्यवहारातून दिसून आले. दोन्ही निवडणूक आयुक्तांनी २९ जुलै २०२६ रोजी कॅबिनेट सचिव टी. व्ही. सोमनाथन यांना पत्रे लिहून गर्ग यांच्या कार्यपद्धतीबाबत आक्षेप नोंदवले होते. संबंधित अधिकाऱ्यांनी आयोगाशी किंवा इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा न करता कामाच्या वाटपात बदल करणारा आदेश जारी केल्याचा आरोप करण्यात आला. या बदलांमुळे मतदार याद्यांच्या व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणाऱ्या माहिती-तंत्रज्ञान प्रणालींच्या देखरेखीचे केंद्रीकरण होण्याची चिंता व्यक्त करण्यात आली होती.

या तक्रारींवर कारवाई करण्याबाबत कॅबिनेट सचिवालयाने सावध भूमिका घेतली. ३ ऑगस्टच्या फाइल नोंदीमध्ये, दोन्ही आयुक्तांनी वैयक्तिक स्तरावर तक्रारी केल्या असून संपूर्ण निवडणूक आयोगाकडून अधिकृत तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे नमूद करण्यात आले. अशा परिस्थितीत स्वतंत्रपणे कारवाई केल्यास एका घटनात्मक संस्थेच्या कामकाजात हस्तक्षेप केल्यासारखे ठरू शकते, असे सचिवालयाने स्पष्ट केले. त्यामुळे तक्रारींवर स्वतंत्र कारवाई करण्यात आली नाही. दोन्ही आयुक्तांना त्यांच्या पत्रांची दखल घेतल्याचे कळवण्यात आले आणि पत्रांच्या प्रती मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यालयाकडेही पाठवण्यात आल्या.

श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट माळवाडी (बोटा) येथे जागतिक संधिवात दिनानिमित्त प्रबोधन कार्यक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

माळवाडी (बोटा)- श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट, माळवाडी (बोटा) येथील फार्मसी महाविद्यालयात १२ ऑक्टोबर रोजी जागतिक संधिवात दिनानिमित्त संधिवात या आजाराविषयी प्रबोधन करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संधिवात या आजाराची लक्षणे, कारणे, प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर निदान आणि योग्य उपचारांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी पायल खेमनार आणि मयुरी ओहोळ यांनी प्रभावीपणे केले. यावेळी विद्यार्थी हर्षल वामन, साक्षी मांडे, अनुष्का सोलाट आणि ओम गुंजाळ यांनी आपल्या भाषणमाध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संधिवाताविषयी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासोबतच रुग्णसेवा आणि आरोग्य जनजागृतीमधील फार्मासिस्टच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले.

संस्थेचे सचिव डॉ अमित पोखरकर यांनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून सांध्यांमध्ये वेदना, सूज आणि कडकपणा यांसारख्या लक्षणांविषयी माहिती दिली. तसेच संधिवाताचे विविध प्रकार, त्यांचा दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम आणि रुग्णांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांवर प्रकाश टाकला. नियमित शारीरिक हालचाली, संतुलित आहार, योग्य वजन राखणे आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार उपचार घेणे यांचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

अध्यक्ष डॉ शिवाजीराव पोखरकर यांनी फार्मसी क्षेत्राच्या दृष्टीने संधिवाताच्या उपचारांमध्ये औषधांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे म्हटले. त्यामुळे औषधांचा योग्य वापर, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वेदनाशामक औषधांचे सेवन टाळणे आणि औषधांच्या संभाव्य दुष्परिणामांविषयी रुग्णांना मार्गदर्शन करणे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच रुग्णांना योग्य औषधोपचारांविषयी माहिती देणे आणि उपचारांबाबत जागरूकता निर्माण करणे ही फार्मासिस्टची महत्त्वपूर्ण जबाबदारी असल्याचा संदेश त्यांनी यावेळी दिला. या कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन आणि अंमलबजावणी प्रा. निशा वरे यांच्या मार्गदर्शनाखाली द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष आणि अंतीम वर्षातील इव्हेंट मॅनेजमेंट कमिटीच्या सदस्यांनी यशस्वीरीत्या केली.

कार्यक्रमासाठी अध्यक्ष डॉ शिवाजीराव पोखरकर, सचिव डॉ अमित पोखरकर, प्राचार्य डॉ सागर सांगळे, प्रा लहू तांदळे, प्रा स्वप्नील वरे, प्रा स्नेहा फंड, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शीतल देवीची सुवर्ण भरारी!

जपानमधील आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई पॅरा गेम्स २०२६ स्पर्धेत भारताची स्टार तिरंदाज शीतल देवीने पुन्हा एकदा सुवर्ण इतिहास रचला आहे. महिला कंपाउंड वैयक्तिक स्पर्धेत तिने सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावले. गतविजेती म्हणून मैदानात उतरलेल्या शीतलने आपल्या विजेतेपदाचा यशस्वीपणे बचाव केला. त्यानंतर या युवा चॅम्पियनला अश्रू अनावर झाले. मैदानावर उपस्थित असलेल्या सपोर्ट स्टाफने भावूक झालेल्या शीतलला सावरले आणि मिठी मारून या ऐतिहासिक क्षणाचा आनंद साजरा केला. 'लोकमत'चं थहरी-ग्रि चॅनल फॉलो करा! दोन्ही हात नसलेल्या शितलने एका दिवसांत देशासाठी २ सुवर्ण पदकांसह एक रौप्यशीतल देवीने गुरुवारी प्रथम तोमर कुमारसोबत मिश्र सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. त्यानंतर तिने वैयक्तिक स्पर्धेतही सुवर्णपदक जिंकले. अवघ्या काही तासांच्या अंतराने देशाला दोन सुवर्णपदके मिळवून देत शीतलने पदकतालिकेत भारताची स्थिती आणखी मजबूत केली.

आशीर्वाद नागरी सहकारी पतसंस्था, संगमनेर

आशीर्वाद'चा ३८ वर्षांचा अखंड प्रवास यज्ञ!

गुरुवार, दि. २० ऑक्टोबर १९८८ दसऱ्याचा पवित्र दिवस!

त्या दिवशी मनात एक वेगळीच अनुभूती होती एका नव्या स्वप्नाची, एका नव्या संकल्पाची आणि समाजासाठी काहीतरी वेगळे करून दाखविण्याच्या जिद्दीची! याच मंगलदिनी 'आशीर्वाद' या नावाने सुरू केलेला प्रवास म्हणजे केवळ एका संस्थेची सुरुवात नव्हती, तर सर्वसामान्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी पेटवलेला एक सेवायज्ञ होता.

दसऱ्याच्या दिवशी प्रज्वलित होणाऱ्या होमाच्या पवित्र अग्निप्रमाणे आणि शिर्डीतील साईबाबांच्या अखंड तेवणाऱ्या धुनीप्रमाणे हा यज्ञ सदैव तेजोमय राहावा, हीच मनापासून प्रार्थना! आज या प्रवासाला ३८ वर्षे पूर्ण होत असताना मागे वळून पाहिले की मन समाधानाने आणि कृतज्ञतेने भरून येते.

गेली ३८ वर्षे हा सेवायज्ञ अखंडपणे तेवत आहे. अनेकांच्या सुख-दुःखांत सहभागी होत, गरजेच्या वेळी मदतीचा हात पुढे करत आणि विश्वासाच्या बळावर माणुसकीचे नाते जपत 'आशीर्वाद'ने आपली वाटचाल सुरू ठेवली आहे. संस्था उभी करणे ही एक गोष्ट; पण त्या संस्थेच्या माध्यमातून अनेकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणे, अडचणीच्या काळात आधार बनणे आणि विश्वासाचे नाते जपणे, हेच खरे यश! या ३८ वर्षांच्या प्रवासात अनेक चढ-उतार आले असतील; परंतु सभासदांचा विश्वास, हितचिंतकांचे सहकार्य, संचालक मंडळाचे योगदान आणि कर्मचाऱ्यांची निष्ठा यांच्या बळावर संस्थेने आपली वाटचाल सातत्याने पुढे नेली.

आज या यशस्वी प्रवासाकडे पाहताना मनात एकच भावना दाटून येते-कृतज्ञता! कृतज्ञता त्या सर्व सभासदांची, ज्यांनी संस्थेवर विश्वास ठेवला. कृतज्ञता त्या सर्व हितचिंतकांची, ज्यांनी वेळोवेळी सहकार्य केले. कृतज्ञता संचालक मंडळाची आणि कर्मचाऱ्यांची, ज्यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी मनापासून योगदान दिले. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, ३८ वर्षांपूर्वी पाहिलेल्या स्वप्नावर विश्वास ठेवून त्याच्या पूर्ततेसाठी केलेल्या अखंड प्रयत्नांचे आज समाधान वाटते.

या प्रवासात मनापासून एकच भावना व्यक्त करावीशी वाटते 'आशीर्वाद'च्या नावाने पेटवलेला हा सेवायज्ञ असाच अखंड तेवत राहो!

दसऱ्याच्या पवित्र अग्निप्रमाणे त्याचे तेज सदैव वाढत राहो
साईबाबांच्या धुनीप्रमाणे त्याची ज्योत कधीही मंदावू नये
आणि गरजूंच्या मदतीसाठी पुढे होणारा हात कधीही थांबू नये!

आर्थिक व्यवहारांपलीकडे जाऊन माणुसकी, विश्वास, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी यांचा वारसा जपणारी संस्था म्हणून आशीर्वादची ओळख अधिकाधिक दृढ होत राहो.

३८ वर्षांपूर्वी पेरलेल्या एका छोट्याशा बीजातून आज विश्वासाचा वटवृक्ष उभा राहिला आहे.

ही केवळ एका संस्थेची वाटचाल नाही; हा विश्वासाचा, सहकार्याचा आणि सेवाभावाचा प्रवास आहे!

आज मनापासून वाटते
३८ वर्षांपूर्वी पाहिलेल्या स्वप्नाचे सार्थक झाले!

आशीर्वादचा हा सेवायज्ञ असाच अखंड सुरू राहो आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणेचा दीप बनो!



शब्दांकन :
दिलीपराव पुंड (माजी नगराध्यक्ष)
अरुण ताजणे (माजी चेअरमन)

शिक्षकांनी अनुभवजन्य अध्यापनातून 'कौशल्ये' रूजवावी - डॉ. संजय मालपाणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भावी शिक्षकांनी समग्र विचार करून प्रशिक्षणाचे नियोजन करावे, शैक्षणिक बदल वेगाने होत असतांना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी निरीक्षणे नोंदवून अनुभवजन्य अध्यापनातून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये रूजवावेत असे आवाहन शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी केले ते विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील दि. २२ ऑक्टोबर रोजी 'प्रारंभ व प्रेरण' कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते व्यासपीठावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरविद्याशाखीय अभ्यास विभागाचे अधिष्ठाता डॉ. सदानंद बनसोडे व प्राचार्य डॉ. भालचंद्र भावे, प्राचार्या सविता घुले, आयक्युएसी विभाग प्रमुख डॉ. राजू शेख, विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी



डॉ. ज्योती मेस्त्री उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना आत्मस्वरूपाचे ज्ञान होण्यासाठी भाषा शिक्षण प्रयोगाची निर्मिती करावी, अनुभजन्य परिस्थिती प्रदान करून विद्यार्थांमधील सुप्त गुणांना वाव देणे ही शिक्षकांची भूमिका असली पाहिजे. डिजिटल साधनांचा वापर विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक व जबाबदारीने करण्यासाठी योग्य चर्चा विद्यार्थ्यांसमोर मांडवी, सत्य व असत्य याची जाणीव करून द्यावी. निरंतन वाचन व ग्रंथ वाचनाला पर्याय नाही असेही त्यांनी सांगीतले. प्रमुख पाहुणे जेष्ठ अधिष्ठाता डॉ. सदानंद बनसोडे यांनी आपल्या मार्गदर्शनातून ज्ञान, संशोधन, वाचनसंस्कृती आणि शैक्षणिक विकासाचे महत्त्व स्पष्ट केले. शिक्षण हे आत्मविश्वास व जिज्ञासा वाढविणारे असले पाहिजे त्यासाठी कौशल्यांवर आधारित शिक्षणाचे महत्व त्यांनी अधोरेखित केले. द्वितीय सत्रात स्पर्धा परीक्षांचे अभ्यासक डॉ. संतोष बो-हाडे यांनी 'स्पर्धा परीक्षांची तयारी व आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. स्वाती ठुबे यांनी 'विशाखा समिती' या विषयावर मार्गदर्शन करताना महिला सुरक्षा, सन्मान, सुरक्षित शैक्षणिक वातावरण आणि तक्रार निवारण यंत्रणेचे महत्त्व स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. भावे यांनी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून बी.एड्. अभ्यासक्रमाचे महत्व सांगितले. यावेळी सर्व प्राध्यापकांसह मोठ्या संख्येने छात्र प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कविता काटे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. नयना पंजे यांनी मांडले. अतिथी परिचय डॉ. राजू शेख यांनी तर कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. ज्योती मेस्त्री यांनी केले.

प्रेमानंदजी दादासाहेब रुपवते यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त मुंबईत अभिवादन सभा



संगमनेर : महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षाचे औचित्य साधून व प्रेमानंदजी दादासाहेब रुपवते यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ८ वाजता मुंबई येथे भव्य अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ अरविंद वैद्य यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या 'पुन्हा क्रांतीज्योती' या भव्य एकपात्री प्रयोगाचे विशेष आकर्षण असणार आहे.

शांती फाउंडेशन निर्मित या एकपात्री प्रयोगाची संकल्पना डॉ. सोमनाथजी मुतकुळे यांची असून, लेखन, दिग्दर्शन आणि अभिनयाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचा विचार प्रभावीपणे मांडला जाणार आहे. महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा, सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा आणि समतेच्या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या कार्यक्रमाकडे विचारप्रेमींचे लक्ष लागले आहे.

या प्रयोगासाठी संगीताची जबाबदारी प्रवीण धुळे व विक्रम कासार सांभाळणार आहेत. नेपथ्य विठ्ठल शिंदे यांचे असून, लाईट्सची जबाबदारी नवनाथ कर्डिले व ज्ञानेश्वर वर्षे यांच्याकडे आहे. संदीप वाकचौरे यांचे मार्गदर्शन लाभणार असून, सूत्रधार म्हणून सूर्यकांत शिंदे व वसंत बंदावणे काम पाहणार आहेत. प्रेमानंदजी दादासाहेब रुपवते यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित ही अभिवादन सभा सामाजिक व वैचारिक योगदानाचा गौरव करण्याबरोबरच महात्मा फुले यांच्या परिवर्तनवादी विचारांना उजाळा देणारी ठरणार आहे. बहुजन शिक्षण संघ आणि दादासाहेब रुपवते फाउंडेशन यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे कार्यकारी विश्वस्त ॲड. संघराज दा. रुपवते यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

संपादकीय...

जागतिक पोलिओ दिनानिमित्ताने

पोलिओमुक्त जगासाठी लसीचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा!

दरवर्षी २४ ऑक्टोबर हा दिवस जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पोलिओ या गंभीर संसर्गजन्य आजाराविषयी जनजागृती करणे, बालकांना पोलिओपासून सुरक्षित ठेवण्यासाठी लसीकरणाचे महत्त्व पटवून देणे आणि जगाला पूर्णपणे पोलिओमुक्त करण्याच्या प्रयत्नांना गती देणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. वैद्यकीय विज्ञानातील प्रगतीमुळे पोलिओवर नियंत्रण मिळवणे शक्य झाले असले, तरी जगातून या रोगाचे पूर्ण उच्चाटन करण्याचे आव्हान अद्याप कायम आहे. त्यामुळे जागतिक पोलिओ दिन हा केवळ जनजागृतीचा दिवस नसून बालकांच्या निरोगी भविष्याचा संकल्प करण्याची संधी आहे. पोलिओ हा पोलिओव्हायरसमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. हा विषाणू प्रामुख्याने दूषित पाणी आणि अन्नाद्वारे शरीरात प्रवेश करतो. विशेषतः स्वच्छतेचा अभाव असलेल्या परिसरात त्याचा प्रसार होण्याचा धोका वाढतो. हा आजार प्रामुख्याने पाच वर्षांखालील बालकांना प्रभावित करतो. अनेक संक्रमित व्यक्तींमध्ये लक्षणे दिसून येत नाहीत; मात्र काही रुग्णांमध्ये ताप, थकवा, डोकेदुखी आणि स्नायू दुखणे अशी लक्षणे दिसू शकतात. गंभीर परिस्थितीत विषाणू मज्जासंस्थेवर परिणाम करून कायमस्वरूपी पक्षाघात घडवू शकतो. काही प्रकरणांमध्ये श्वसनासाठी आवश्यक असलेल्या स्नायूंवर परिणाम झाल्यास जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. पोलिओवर विशिष्ट उपचार उपलब्ध नसल्यामुळे प्रतिबंध हाच सर्वांत महत्त्वाचा उपाय आहे. जागतिक आरोग्य संघटना आणि विविध देशांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पोलिओविरोधातील लढ्याला मोठे यश मिळाले आहे. लसीकरण मोहिमा, आरोग्य कर्मचाऱ्यांचे योगदान आणि जनजागृती यांच्या मदतीने जगभरात पोलिओच्या रुग्णसंख्येत मोठी घट झाली. एकेकाळी हजारो बालकांना अपंगत्वाच्या विळख्यात ढकलणाऱ्या या आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी अनेक देशांनी व्यापक लसीकरण कार्यक्रम राबवले. मात्र, काही भागांमध्ये पोलिओ विषाणूचे अस्तित्व अजूनही आढळत असल्यामुळे जागतिक स्तरावर सतर्कता आणि लसीकरणाचे सातत्य आवश्यक आहे. भारतासाठी पोलिओविरोधातील लढा हा सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. भारतात १३ जानेवारी २०११ रोजी पश्चिम बंगालमधील हावडा येथे जंगली पोलिओ विषाणूचा शेवटचा रुग्ण आढळला. त्यानंतर २०१४ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने भारताचा समावेश पोलिओमुक्त दक्षिण-पूर्व आशिया प्रदेशात केला. हे यश सरकार, आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे शक्य झाले. भारताच्या पोलिओ निर्मूलन मोहिमेत 'पल्स पोलिओ' कार्यक्रमाची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. या कार्यक्रमांतर्गत पाच वर्षांखालील बालकांना पोलिओचे थेंब दिले जातात. आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन बालकांचे लसीकरण करतात. ग्रामीण, दुर्गम आणि वंचित भागांतील बालकांपर्यंत लस पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. पालकांचा सहभाग, आरोग्य यंत्रणेचे नियोजन आणि जनजागृती यांमुळे या मोहिमेला व्यापक यश मिळाले. मात्र, भारत पोलिओमुक्त झाला असला, तरी जगातील इतर भागांत विषाणूचे अस्तित्व असल्यामुळे लसीकरणाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. पोलिओविरोधातील लढ्यात लसीकरणाबरोबरच स्वच्छतेलाही महत्त्व आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी, परिसराची स्वच्छता, शौचालयांचा वापर आणि हात धुण्याच्या सवयी यांमुळे संसर्गजन्य आजारांचा धोका कमी होतो. विशेषतः लहान मुलांच्या आरोग्याबाबत पालकांनी अधिक जागरूक राहणे आवश्यक आहे. बालकाला निर्धारित वेळापत्रकानुसार सर्व आवश्यक लसी मिळाल्या आहेत का, याची खात्री करणे ही पालकांची जबाबदारी आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे आणि लसीकरणाबाबतच्या गैरसमजांना बळी न पडणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आजच्या काळात सोशल मीडियावर आरोग्यविषयक चुकीची माहिती वेगाने पसरते. काही वेळा लसीकरणाबाबत भीती निर्माण करणारे संदेश प्रसारित होतात. अशा संदेशांवर विश्वास ठेवण्याऐवजी डॉक्टर, आरोग्य कर्मचारी किंवा अधिकृत आरोग्य संस्थांकडून माहिती घ्यावी. लसीकरणामुळे अनेक गंभीर आजारांपासून संरक्षण मिळते, हे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले आहे. त्यामुळे अफवांपेक्षा विज्ञानावर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. पोलिओ निर्मूलनाच्या जागतिक प्रयत्नांमध्ये रोटरी इंटरनॅशनलसह अनेक आंतरराष्ट्रीय संस्था, आरोग्य संघटना आणि स्वयंसेवकांचे योगदान महत्त्वाचे आहे. जनजागृती, निधी, लसीकरण मोहिमा आणि आरोग्य यंत्रणांना सहकार्य अशा विविध माध्यमांतून या संस्थांनी पोलिओविरोधातील लढ्याला बळ दिले आहे. जगभरातील पोलिओ रुग्णांमध्ये १९८८ पासून ९९ टक्क्यांहून अधिक घट झाली असली, तरी पूर्ण निर्मूलनासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे.

वाचन प्रेरणा दिनानिमित्त मुंबई विद्यापीठात लोकसाहित्य नोंदलेखन कार्यशाळा उत्साहात



मुंबई (पराग कुलकर्णी)

महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग महाराष्ट्र विश्वकोश निर्मिती मंडळ आणि मुंबई विद्यापीठाची लोककला अकादमी अंतर्गत शाहीर अमरशेख अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत कार्यशाळेच्या उद्घाटन समरंभा प्रसंगी पहिल्या राष्ट्रीय लोकरंग महोत्सवाचे अध्यक्ष आणि लोककला अकादमीचे माजी विभाग प्रमुख प्रा. प्रकाश खांडगे बोलत होते.

या समारंभात श्विश्वकोश निर्मिती विद्याव्यासंगी म. वि. मंडळाचे, डॉ. जगतानंद भटकर, संगीत विभाग प्रमुख प्रा. मनीषा कुलकर्णी, नाट्यशास्त्र विभागाच्या संचालिका रश्मी देव तसेच नाट्यशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्रा. मंगेश बनसोड, संशोधक विद्यार्थी आदेश चंद्रकांत बांदेकर उपस्थित होते. असे विभाग प्रमुख प्रा. गणेश चंदनशिवे यांनी सांगितले.

या कार्यशाळेत मुंबई विद्यापीठाच्या पातळीवर लोककलेचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षणाची आणि संशोधनाची बैठक प्राप्त झाल्यामुळे लोककलांमध्ये संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे .त्यामुळे महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ सारख्या संस्थांनी नोंदीच्या आणि संशोधन सिद्धांतांच्या कार्यशाळा आयोजित करणे अत्यावश्यक आहे. असे प्रा. खांडगे यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेत इंग्रजी विभागाच्या वरिष्ठ प्राध्यापिका भाग्यश्री वर्मा, नालंदा नृत्य महाविद्यालयाच्या प्रा. माधुरी देशमुख, प्रा. मंगेश बनसोड आणि डॉ. जगतानंद भटकर यांचे संशोधन पद्धती आणि लोकसाहित्य नोंदलेखन कार्यशाळेत मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळेत विभागातील आणि बाहेरच्या तब्बल सत्तर अभ्यासक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यशाळेच्या उत्तम आयोजना बद्दल लोककला अकादमीतील विद्यार्थी, शिक्षक, प्रशिक्षक आणि शिक्षेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. तर प्रा. मदन दुबे यांनी सूत्रसंचालन केले. तर शिवाजी वाघमारे यांनी आभार मानले.

हजरत मौलाना डॉ. सईदुर्रहमान आझमी नदवी (रह.) यांच्या स्मरणार्थ शोकसभा आयोजित



युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर- मदरसा नदवतुल उलमा चे माजी प्राचार्य, प्रसिद्ध धर्मगुरु हजरत मौलाना डॉ. सईदुर्रहमान आझमी नदवी (रह.) यांच्या निधनाबद्दल मदरसा हुदैबिया लिलबनात, श्रीरामपूर तर्फे एका शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. ही सभा मुफ्ती मोहम्मद रिझवान अल-हसन साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मदरसाच्या परिसरात आयोजित करण्यात आली होती, ज्याचे अध्यक्षस्थान प्रसिद्ध धर्मगुरु मुफ्ती शाकिर साहेब (पुणे) यांनी भूषवले.

या सभेत मौलाना अय्यूब नदवी, मौलाना आसिफ मिल्ली, मौलाना अब्दुर्रऊफ आझाद, अब्दुल्ला हसन चौधरी, मौलाना साद, सलीम खान पठाण, मोहम्मद रफीक शेख यांच्यासह इतर मान्यवरांनी सहभाग घेतला आणि हजरत मौलाना यांच्या शैक्षणिक, धार्मिक, अध्यापन आणि सुधारणावादी कार्याला श्रद्धांजली अर्पण केली.

सभेच्या शेवटी हजरत मौलाना यांच्या क्षमेसाठी व उच्च स्थानासाठी, त्यांच्या धार्मिक सेवांचा स्वीकार होण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबीय आणि संबंधितांसाठी संयमासाठी प्रार्थना करण्यात आली. यावेळी अहमदनगर जिल्ह्यातील अनेक धर्मगुरु, धार्मिक मदरशांशी संबंधित मान्यवर आणि शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या.

टीम इंडियाचा रेकॉर्ड ब्रेक विजय

भारताने न्यूझीलंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी२० मालिकेत पहिला विजय मिळवला आहे. यासह मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. खरं तर न्यूझीलंडने दिलेलं २२५ धावांचं आव्हान कठीण होतं. पण भारताने ४ गडी आणि २ चेंडू राखून हा विजय मिळवला. यासह टी२० क्रिकेटमध्ये ऐतिहासिक नोंद केली आहे. टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट इतिहासातील भारताचा सर्वात मोठा यशस्वी पाठलाग आहे. टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये न्यूझीलंडविरुद्ध कोणत्याही संघाने केलेला हा दुसरा सर्वात मोठा यशस्वी पाठलाग आहे. यापूर्वी २०१८ मध्ये ऑकलंड येथे ऑस्ट्रेलियाने न्यूझीलंडविरुद्ध २४४ धावांचा यशस्वी पाठलाग केला होता. दरम्यान, भारताने २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध विशाखापट्टणममध्ये २०९ धावांचा यशस्वी पाठलाग केला होता. त्यानंतर रायपूर्वी २०२६ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध २०९ धावांचं लक्ष्य गाठलं होतं.२०१९ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध २०८ धावा, २००९ मध्ये श्रीलंकेविरुद्ध २०७ धावा आणि २०२० मध्ये न्यूझीलंडविरुद्ध २०४ धावांचं लक्ष्य गाठलं होतं. न्यूझीलंड संघाने त्यांच्या मायभूमीत भारताविरुद्ध खेळलेल्या शेवटच्या ८ टी२० सामन्यांपैकी सात सामने गमावले आहेत. यात एकमेव अपवाद २०२२ मधील नॅपियर येथील सामना होता. हा सामना डकवर्थ-लुईस नियमानुसार बरोबरीत सुटला होता. दुसरीकडे, टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये धावसंख्येचा यशस्वी पाठलाग करताना भारताकडून सातव्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना नमन धीरने केलेली नाबाद ४२ धावांची सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या ठरली आहे.

आंभोळचे सुपुत्र बाळासाहेब साबळे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार



युवावार्ता(प्रतिनिधी)

अंभोळ- अकोले तालुक्यातील आंभोळ गावचे सुपुत्र आणि गावाचे भूषण असलेले बाळासाहेब साबळे सर यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल स्पायर फाऊंडेशन, नाशिक यांच्यातर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नाशिक येथे नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बाळासाहेब साबळे सर हे पुणे येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असून, त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्यातून अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्राधान्य देत त्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले असून, शाळेची १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेतील यशापुरते मर्यादित न ठेवता त्यांच्यात ज्ञान, आत्मविश्वास आणि गुणवत्ता विकसित करण्यासाठी साबळे सरांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या मार्गदर्शनातून हजारो विद्यार्थी घडले असून, त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत यापूर्वीही त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारामुळे त्यांच्या शैक्षणिक योगदानाचा पुन्हा एकदा गौरव झाला आहे.

साबळे सरांच्या कुटुंबातील सदस्यांनीही शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. त्यांची कन्या तेजस ही आयआयटीमधून अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण करून उच्चशिक्षित अभियंता झाली आहे, तर त्यांचा मुलगाही आयआयटीमधून अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे. त्यांच्या पत्नीही शिक्षिका असून, त्या शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. बाळासाहेब साबळे सर यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याने आंभोळ गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

पान १ वरून

अकोल्यात महा ...

असून ती शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा आहे, अशी टीका आंदोलकांनी केली. एका बाजूला पावसाअभावी पिकांचे नुकसान झाले आहे, उत्पादन घटले आहे आणि शेतीवरील खर्च व कर्जाचा बोजा वाढला आहे; तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची मदत मिळवण्यासाठी आंदोलन करावे लागत आहे. नमो किसान निधीचे देय चार हजार रुपये थकवून ठेवायचे आणि त्यानंतर दुष्काळी मदतीच्या नावाखाली पाच हजार रुपये जाहीर करायचे, हा शेतकऱ्यांवरील अन्याय असल्याचे सभेत स्पष्ट करण्यात आले.

नियमित कर्जदारांना किमान दोन लाख रुपये प्रोत्साहन अनुदान मिळावे, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पीकविम्याच्या संरक्षित रकमेनुसार नुकसानभरपाई तातडीने मिळावी, विमा कंपन्या आणि प्रशासकीय यंत्रणेच्या दिरंगाईमुळे शेतकऱ्यांना वंचित ठेवू नये, अशी मागणी करण्यात आली.

वन जमिनी, गायरान, घर तळ जमिनी, वरकस, देवस्थान जमिनी आणि प्रत्यक्ष कसणाऱ्या शेतकरी व भूमिहीन कुटुंबांच्या नावे कराव्यात, अशी मागणी आंदोलनातून करण्यात आली. अनेक वर्षांपासून या जमिनी कसणाऱ्या कुटुंबांच्या उपजीविकेचा आणि हक्काचा प्रश्न प्रलंबित आहे. प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यांना त्यांच्या जमिनींचे कायदेशीर हक्क मिळाले पाहिजेत, अशी भूमिका किसान सभेने मांडली. तहसीलदारांनी या मागण्यांकडे लक्ष देऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. मात्र, केवळ आश्वासनांवर समाधान न मानता मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला. अकोले येथे सुरू असलेला रात्रंदिवसचा महामुक्काम सत्याग्रह २६ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे. तोपर्यंत राज्य सरकारने मागण्यांबाबत ठोस निर्णय घेतला नाही, तर राज्यभरातून किसान सभेच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांची शेकडो वाहने अकोले येथून मुंबईच्या दिशेने रवाना होतील. २६ ऑक्टोबर रोजी अकोले ते मुंबई राज्यव्यापी वाहन लाँग मार्च काढून सरकारला शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यास भाग पाडले जाईल असा ठाम इशारा आंदोलनाच्या वतीने देण्यात आला. अकोले येथे सुरू असलेल्या महा मुक्काम आज दुसऱ्या दिवशी रात्रीही सुरू राहणार आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक मागण्या सोडवण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी, संगमनेर प्रांताधिकारी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक, पोलीस उपाधीक्षक, अकोले तहसीलदार व इतर अधिकाऱ्यांबरोबर सायंकाळी सुमारे तीन तास सखोल बैठक झाली. स्थानिक मागण्या यावेळी मार्गी लावण्यात आल्या. मात्र राज्यस्तरीय मागण्यासाठी महामुक्काम आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय किसान सभेने जाहीर केला.

कामगार भरती

अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक

सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक

वॉचमन- ०१

ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स
अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

पाहिजेत

मे.साईराज सेल्स कॉर्पोरेशन
Exide battery sales & services (Sangamner)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(टॅलीचे ज्ञान आवश्यक)
बॅटरी विषयी माहिती असलेला - 1जागा
संपर्क क्रमांक:
9822312490

पाहिजेत

सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

पाहिजेत

ध्येय फायनान्स संगमनेर
Branch manager BM-1
Branch devlopment Menegar BDM- 1
Sales devlopment MenegarSDM - 1
Telicaller - 2 M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
9370773504
7768079272

पाहिजेत

ऑफिसबॉय (शिपाई)
02 जागा (पुरुष)
शैक्षणिक पात्रता - 10/12 वी पास
वय मर्यादा - 20 ते 40 वर्ष
इच्छुकांनी संस्था कार्यालयात लेखी अर्जासह कागदपत्र दिनांक 26/10/2026 पर्यंत जमा करावे
महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अशोक चौक, संगमनेर
फोन नं. 02425-220777
9623017997
Email- mahesh.patsanstha@gmail.com

भाड्याने देणे आहे

टॉप टेन इम्पेरिअल (रिलायन्स डिजीटल) मध्ये ग्राउंड फ्लोअरचे दोन शॉप किंवा ऑफिस भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909

पाहिजेत

सेल्समन – २
फार्मासिस्ट – १
अनुभावास प्राधान्य
पलोड मेडिकल, संगमनेर नविन नगर रोड, ताजने मळा, सावंत हॉस्पिटल समोर
९९२२२९४००४

पाहिजेत

अकाऊंटंट - 2 जागा
कॅशिअर - 2 जागा
सेल्समन - १० जागा (पु.)
सेल्समन - १० जागा (म.)
वॉचमन - २ जागा
आकर्षक पगार दिले जाईल
मुळचंद होलसेल मिल डेपो
अकोले रोड, सेलिब्रेश हॉटेल समोर, संगमनेर
7498901766

पाहिजेत

सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य)
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ ॲण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

SR THORAT

पाहिजेत

मार्केटिंग वाहतूक गाड्यांची आवश्यक

आमच्या प्रतिदिन दूध .पॅकिंग व दुग्धजन्य पदार्थ करिता संगमनेर तालुका व आसपासच्या परिसरा मध्ये मार्केटिंग कामासाठी खालील प्रकारच्या इन्सुलेटेड गाड्यांची आवश्यकता आहे. साधारण ५०० किलो पर्यंत माल असेल

१.क्रं	गाडीचा प्रकार
१	छोटा हत्ती
२	टाटा झिप
३	महिंद्रा जीतो
४	मारुति सुजुकी सुपर कॅरि

सदर गाडी मालकांनी ऑफिस मध्ये गाडीच्या कागदपत्रासह समक्ष भेटणे. कंपनी कामकाज वेळेत रविवार सोडून. कामासंबधी सर्व अटी व शर्ती कंपनी नियमप्रमाणे राहतील. या संदर्भात आवश्यक ती माहिती कंपनी कार्यलयात मिळेल.
ऑफिस- एस.आर.थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा. लि. राजापूर रोड. संगमनेर
मो.९८६०१००९३६/९३७



शेतकरी कर्जमाफीची चौथी यादी जाहीर

राज्यातील १ लाख १५ हजार शेतकऱ्यांचा समावेश

मुंबई (वृत्तसंस्था)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत सहकार विभागाने गुरुवारी (दि. २२ ऑक्टोबर) कर्जमाफीची चौथी यादी प्रसिद्ध केली आहे. या यादीत एकापेक्षा अधिक बँकांमध्ये पीककर्ज खाती असलेल्या राज्यातील १ लाख १५ हजार ६९७ पात्र शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. संबंधित शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करता यावी, यासाठी ही यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी ही माहिती दिली.



चौथ्या यादीत पुणे विभागातील ३० हजार २४७ शेतकऱ्यांचा समावेश आहे. त्यापैकी पुणे जिल्ह्यातील १६ हजार २४६, सांगलीतील ८ हजार ४८४, साताऱ्यातील ४ हजार २८६, कोल्हापूरमधील ९३४ आणि सोलापूरमधील २९७ शेतकऱ्यांचा समावेश आहे. या आकडेवारीनुसार पुणे जिल्ह्यातील सर्वाधिक शेतकरी कर्जमाफीच्या चौथ्या यादीत आहेत. त्यानंतर सांगली आणि सातारा जिल्ह्यांचा क्रमांक लागतो.

या योजनेसाठी बँकांनी पोर्टलवर एकूण ३१ लाख १७ हजार थकीत कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. या माहितीवर संगणकीय प्रक्रिया केल्यानंतर आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या १५ लाख ८५ हजार पात्र लाभार्थ्यांच्या कर्जखात्यांमध्ये आतापर्यंत १३ हजार २७५ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत.

राज्याच्या विभागनिहाय आकडेवारीनुसार चौथ्या यादीत छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्वाधिक ४७ हजार ५४७ शेतकऱ्यांचा समावेश आहे. त्यानंतर पुणे विभागातील ३० हजार २४७, नाशिक विभागातील १४ हजार १६५, अमरावती विभागातील १३ हजार ३४०, कोकण विभागातील ५ हजार ७९६ आणि नागपूर विभागातील ४ हजार ६०२ शेतकऱ्यांचा समावेश आहे. यापूर्वी या योजनेअंतर्गत तीन याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. पहिल्या यादीत १६ लाख ९६ हजार २०१, दुसऱ्या यादीत ४ लाख १९ हजार ७३७, तर तिसऱ्या यादीत ३ लाख ५१ हजार १९२ पात्र शेतकऱ्यांची नावे होती. या तीन याद्यांमध्ये एकूण २४ लाख ६७ हजार १३० शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला होता.

आता चौथ्या यादीत एकापेक्षा अधिक बँकांकडून पीककर्ज घेतलेल्या आणि दोन लाख रुपयांपेक्षा कमी थकबाकी असलेल्या १ लाख १५ हजार ६९७ पात्र शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. संबंधित शेतकऱ्यांनी यादीतील आपले नाव तपासून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेमुळे पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीच्या पुढील कार्यवाहीत सहभागी होता येणार आहे.

शिक्षकाच्या त्रासाला कंटाळून विद्यार्थ्याची आत्महत्या

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- वसतिगृहातील शिक्षकाकडून त्रास दिला जात असल्याने गेवराई तालुक्यातील १३ वर्षीय विद्यार्थ्याने पाथर्डी येथील हिंद वसतिगृहात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. समर्थ खरात (वय १३, रा. कवडगाव, ता. गेवराई) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. वसतिगृहातील शिक्षक सुभाष घुगे हे समर्थला त्रास देत तसेच मारहाण करत असल्याचा आरोप त्याच्या वडिलांनी फिर्यादीत केला आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी संबंधित शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.दरम्यान, समर्थच्या मृत्यूबाबत नातेवाइकांनी घातपाताचा संशय व्यक्त केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. समर्थ हा पाथर्डी येथील एम. एम. निर्हाळी विद्यालयात इयत्ता सातवीत शिक्षण घेत होता. तो २०२४ पासून हिंद वसतिगृहात राहत होता. त्याचा लहान भाऊ साई हा देखील याच वसतिगृहात राहून शिक्षण घेत आहे. मागील तीन महिन्यांपासून वसतिगृहातील शिक्षक घुगे हे त्रास देत असल्याचे समर्थने वडील आबासाहेब खरात यांना यापूर्वी सांगितले होते. शिक्षक मारहाण करत असल्याचे लहान भाऊ साई यानेही वडिलांना सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

मुलाकडून तक्रार मिळाल्यानंतर आबासाहेब खरात यांनी सुमारे महिनाभरापूर्वी वसतिगृहात जाऊन घुगे यांची भेट घेतली होती. समर्थला त्रास का देता, अशी विचारणा त्यांनी केली असता, मुलाला कोणताही त्रास देत नसल्याचे शिक्षकांनी सांगितल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दोन दिवसांपूर्वी लहान मुलगा साई याचे जेवणाचे ताट हरवले होते. त्यावरून मुलांना त्रास दिला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर वडिलांनी पुन्हा वसतिगृहात जाऊन शिक्षकांची भेट घेतली. ताट मिळवून देण्याचे सांगत मुलांना त्रास देऊ नये, अशी विनंती त्यांनी केली होती. बुधवारी (दि. २१) सकाळी सव्वादहा वाजण्याच्या सुमारास समर्थने वडिलांना फोन करून पोट दुखत असून शौचास जायचे आहे आणि दवाखान्यात जायचे आहे, असे सांगितले. त्यासाठी त्याने तीस रुपये पाठविण्याची विनंती केली. वडिलांनी त्याला पैसे पाठवून दिले. त्यानंतर दुपारी एकच्या सुमारास आबासाहेब खरात हे गेवराई येथे असताना लहान मुलगा साई याने फोन करून समर्थ वसतिगृहात बेशुद्ध अवस्थेत पडल्याचे सांगितले. वडिलांनी पाथर्डीकडे येताना शिक्षक घुगे यांच्याशी संपर्क साधला. समर्थला उपजिल्हा रुग्णालयात आणल्याचे शिक्षकांनी सांगितले. वडील रुग्णालयात पोहोचले असता डॉक्टरांनी समर्थचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

चीनसोबत सीमा वादावर लष्करी तोडगा नाही! - नरवणे

नवी दिल्ली (वत्तसंस्था

जिथे मतभेदाची अशी क्षेत्रे आहेत, तिथे संघर्ष झाले आहेत. ते पुढेही होत राहतील. गलवान संघर्ष हे अशा घटनांचे आणखी एक उदाहरण होते. महत्त्वाची गोष्ट ही आहे की, गलवाननंतरच्या घटनांनी हे स्पष्ट केले आहे की चीनसोबतच्या सीमावादावर लष्करी तोडगा काढणे हा आता पर्याय राहिलेला नाही, असे मोठे विधान भारताचे माजी लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांनी केले आहे.

भारतीय लष्कराचे माजी प्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांनी सांगितले आहे की, या घटनेमुळे चर्चा आणि संवादाद्वारे हा प्रश्न सोडवण्याच्या प्रयत्नांना नवी चालना मिळाली आहे. चीनसोबतचा आपला सीमा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. ड्मी मुद्दाम 'सीमा' हा शब्द वापरत आहे, कारण 'आंतरराष्ट्रीय सीमे'च्या विपरीत जी स्पष्टपणे निश्चित केलेली आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त आहे -'सीमे'ची व्याख्या तितकी स्पष्ट नाही, असेही नरवणे यांनी म्हटले आहे. जिथे सीमावाद आहेत त्या भागांमध्ये संघर्ष सुरूच राहीलजिथे सीमावाद आहेत त्या भागांमध्ये संघर्ष सुरूच राहतील. आम्ही हे स्पष्ट केले आहे की सीमा बदलण्यासाठी एकतर्फी बळाचा वापर स्वीकारार्ह नाही. या भूमिकेमुळे बदल घडून आला आहे. संवादाद्वारे वाद सोडवण्याच्या प्रयत्नांना नवी चालना मिळाली आहे. यामुळे बदल घडून आला आहे.

जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट गडद! ११२५ वाड्या-वस्त्यांना २०० टँकरचा आधार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -जिल्ह्यात पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. जिल्ह्यातील तब्बल १९१ गावांमधील ११२५ वाड्या-वस्त्यांना २०० टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. या टँकरच्या माध्यमातून ३ लाख ८९ हजार ४०१ नागरिकांची तहान भागविण्याची जबाबदारी प्रशासनावर आली आहे. पाणीटंचाईची वाढती व्याप्ती लक्षात घेता आगामी काळात पाणीपुरवठ्याचे नियोजन हे प्रशासनापुढील मोठे आव्हान ठरण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील पाणीटंचाईची तीव्रता तालुकानिहाय वेगवेगळी असली, तरी पाथर्डी तालुक्यात परिस्थिती अधिक गंभीर असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. या तालुक्यातील ६६ गावांमधील ३९५ वाड्या-वस्त्यांना तब्बल ८१ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. जिल्ह्यातील एकूण टँकरपैकी सर्वाधिक टँकर पाथर्डी तालुक्यात कार्यरत आहेत.



कर्जत तालुक्यातील ३६ गावांमधील २५० वाड्या-वस्त्यांसाठी ३२ टँकर सुरू आहेत. शेवगाव तालुक्यात ३१ गावांतील १८७ वाड्या-वस्त्यांना २३ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. नगर तालुक्यातील २० गावांमधील १०१ वाड्या-वस्त्यांसाठी १९ टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे.

जामखेड तालुक्यातील १४ गावांमधील ३१ वाड्या-वस्त्यांना १६ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पारनेर तालुक्यातील ८ गावांमधील ४६ वाड्या-वस्त्यांसाठी ७ टँकर, तर संगमनेर तालुक्यातील ९ गावांमधील १७ वाड्या-वस्त्यांसाठी ८ टँकर कार्यरत आहेत. श्रीगोंदे तालुक्यातील ४ गावांमधील ४९ वाड्या-वस्त्यांना ४ टँकरद्वारे पाणी उपलब्ध करून दिले जात आहे. नेवासे तालुक्यातील २ गावांमधील १८ वाड्या-वस्त्यांसाठी २ टँकर सुरू आहेत.

जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारण्यासाठी प्रशासनाने एकूण २०० टँकरची व्यवस्था केली आहे. यामध्ये अवघे ४ शासकीय, तर तब्बल १९६ खासगी टँकरचा समावेश आहे. खासगी टँकरच्या माध्यमातूनच जिल्ह्यातील बहुतांश टंचाईग्रस्त भागांमध्ये पाणीपुरवठा केला जात आहे.

टंचाईग्रस्त गावांतील नागरिकांना वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी प्रशासनाकडून टँकरच्या फेऱ्यांचे नियोजन केले जात आहे. उपलब्ध जलस्रोतांचा योग्य वापर, टँकरद्वारे पाणी वितरण आणि नागरिकांच्या गरजेनुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन यावर प्रशासनाचा भर आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून असलेल्या गावांची आणि वाड्या-वस्त्यांची संख्या मोठी असल्याने पाणीपुरवठा यंत्रणेवर ताण वाढत आहे. विशेषतः दुर्गम भागांतील वाड्या-वस्त्यांपर्यंत नियमित पाणी पोहोचविणे, टँकरच्या फेऱ्यांमध्ये खंड पडू न देणे आणि उपलब्ध पाण्याचे योग्य वितरण करणे आवश्यक ठरत आहे.

जिल्ह्यातील सुमारे ३ लाख ८९ हजार नागरिकांना टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवावे लागत असल्याचे चित्र पाणीटंचाईची व्याप्ती अधोरेखित करते. त्यामुळे तातडीच्या टँकर व्यवस्थेसोबतच उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर आणि दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देण्याची गरज निर्माण झाली आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी प्रशासनाला सातत्याने सतर्क राहून पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे लागणार आहे.

दिनविशेष

२००८: — भारताने पहिल्या मानवविरहित चांद्रयान-१चे प्रक्षेपण केले.

१९९४: — भारतीय उद्योगपती नवीनभाई सी. दवे यांना ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ यांचा उद्योग व शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल कोट ऑफ आर्म्स पुरस्कार जाहीर.

१९६४: — फ्रेन्च लेखक, कवी आणि तत्त्वज्ञ जेआँ-पॉल सार्त्र यांना नोबेल पुरस्कार मिळाला पण त्यांनी तो नाकारला.

१९६३: — पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते भाक्रा धरण राष्ट्राला अर्पण करण्यात आले.

१९३८: — चेस्टर कार्लसनने जगातील पहिले झेरॉक्स मशिन तयार केले.

१९२७: — निकोला टेस्ला यांनी सिंगल-फेज इलेक्ट्रिकसह सहा नवीन शोध लावले.

१७९७: — बलूनमधून १००० मीटर उंच जाऊन पॅराशूटच्या साहाय्याने आंद्रे जॅक्कस गार्नेरिन जमिनीवर उतरणारा पहिला मानव बनला.

१६३३: — लियाओउलू उपसागाराची लढाई - मिंग राजघराण्याने डच ईस्ट इंडिया कंपनीला पराभूत केले.

जन्म

१९७४: अरविंद अडिगा — भारतीय पत्रकार आणि लेखक

१९४५: शफी इनामदार — अभिनेते व नाट्यनिर्माते (निधन: १३ मार्च १९९६)

१९४०: पेले — ब्राझिलियन फुटबॉल खेळाडू

१९३७: देवेन वर्मा — भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते (निधन: २ डिसेंबर २०१४)

१९२४: पं. राम मराठे — संगीतकार, गायक व नट संगीतभूषण (निधन: ४ ऑक्टोबर १९८९

१९२३: मधुकाका कुलकर्णी — भारतीय श्री विद्या प्रकाशनचे संस्थापक (निधन: २२ फेब्रुवारी २०००)

१९२३: असलम फारुखी — भारतीय-पाकिस्तानी भाषाशास्त्रज्ञ, लेखक आणि विद्वान (निधन: १५ जून २०१६)

१९००: डग्लस जार्डिन — इंग्लिश क्रिकेटपटू (निधन: १८ जून १९५८)

१८७९: अहिताग्नी राजवाडे — वैदिक धर्माचे पुरस्कर्ते (निधन: २७ नोव्हेंबर १९५२)

१७७८: कित्तूर चेन्नम्मा — कित्तूरची राणी (निधन: २१ फेब्रुवारी १८२९)

मृत्यू

२०२५: पियुष पांडे — भारतीय जाहिरात क्षेत्रातील दिग्गज, ओगिल्वीचे माजी ग्लोबल मुख्य क्रिएटिव्ह अधिकारी आणि सर्जनशील व्यक्तिमत्त्व — पद्मश्री, एलआयए लेजेंड पुरस्कार (जन्म: ५ सप्टेंबर १९५५)

२०२५: के. पोन्नुसामी — भारतीय राजकारणी, तमिळनाडूचे आमदार

२०२५: पियूष पांडे — भारतीय जाहिरात क्षेत्रातील दिग्गज, ओगिल्वी इंडियाचे माजी प्रमुख (जन्म: ५ सप्टेंबर १९५५)

२०२५: मलेशिया भास्कर — भारतीय स्टंटमन

२०१२: सुनील गंगोपाध्याय — बंगाली कवी व कादंबरीकार (जन्म: ७ सप्टेंबर १९३४)

१९५७: ख्रिश्चन डायर — ख्रिश्चन डायर एस. ए. चे संस्थापक (जन्म: २१ जानेवारी १९०५)

१९४३: वाकाशिमा गोंशिरो — २१वे योकोझुना, जपानी सुमो (जन्म: १९ जानेवारी १८७६)

१९२१: जॉन बॉईड डनलॉप — डनलॉप रबरचे संस्थापक (जन्म: ५ फेब्रुवारी १८४०)

१९१५: डब्ल्यू. जी. ग्रेस — इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: १८ जुलै १८४८)

१९१०: राम (पाचवा) — थायलँडचा राजा (जन्म: २० सप्टेंबर १८५३)



दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

२४ ऑक्टोबर

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते भाक्रा धरण राष्ट्राला समर्पित

भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते भाक्रा धरण राष्ट्राला समर्पित करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर भारताच्या शेती, सिंचन, वीजनिर्मिती आणि औद्योगिक विकासाला चालना देणाऱ्या महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये भाक्रा धरणाचा समावेश होतो. देशाच्या जलसंपत्तीचा नियोजनबद्ध वापर करण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाने महत्त्वाची भूमिका बजावली.भाक्रा धरण हिमाचल प्रदेशातील बिलासपूर जिल्ह्यात सतलज नदीवर बांधण्यात आले आहे. या धरणाची उंची पायापासून सुमारे २२५.५५ मीटर असून, ते भारतातील उंच धरणांपैकी एक आहे. धरणामुळे निर्माण झालेल्या विशाल जलाशयाला 'गोविंद सागर' असे नाव देण्यात आले आहे. या जलाशयात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा करता येतो. त्यामुळे पाण्याचे नियोजन, सिंचन आणि वीजनिर्मितीसाठी या प्रकल्पाचा उपयोग होतो.भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशासमोर अन्नधान्याची कमतरता, शेतीसाठी पाण्याची मर्यादित उपलब्धता आणि औद्योगिक विकासाची आव्हाने होती. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला नियमित पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. या पार्श्वभूमीवर भाक्रा-नांगल प्रकल्पाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या प्रकल्पामुळे शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच जलविद्युत निर्मिती करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले.भाक्रा धरणाच्या उभारणीसाठी अभियंते, तंत्रज्ञ आणि हजारो कामगारांनी परिश्रम घेतले. मोठ्या प्रमाणावरील बांधकाम, तांत्रिक आव्हाने आणि नदीच्या पाण्याचे नियोजन यांमुळे हा प्रकल्प अभियांत्रिकी क्षेत्रातील महत्त्वाची कामगिरी ठरला. या धरणाच्या निर्मितीमुळे भारताची मोठे विकासप्रकल्प उभारण्याची क्षमता अधोरेखित झाली.या प्रकल्पाचा लाभ विशेषतः पंजाब, हरियाणा आणि राजस्थान या राज्यांना झाला. सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाल्यामुळे अनेक भागांतील शेतीला आधार मिळाला. शेतीच्या उत्पादनवाढीसाठी पाण्याची उपलब्धता महत्त्वाची असल्याने या प्रकल्पाने कृषी विकासात योगदान दिले. तसेच धरणातून निर्माण होणाऱ्या जलविद्युत ऊर्जेमुळे विविध भागांतील वीजपुरवठ्याला मदत झाली. शेतीबरोबरच उद्योग, व्यापार आणि नागरी विकासासाठीही ऊर्जेचे महत्त्व असल्याने या प्रकल्पाचा आर्थिक विकासाशी जवळचा संबंध आहे.पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशाच्या विकासासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिक पायाभूत सुविधांना महत्त्व दिले. मोठी धरणे ही आधुनिक भारताच्या प्रगतीची प्रतीके असल्याचे त्यांचे मत होते..

अरविंद अडिगा - भारतीय पत्रकार आणि लेखक

जन्मदिन विशेष

अरविंद अडिगा हे भारतीय पत्रकार आणि इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध लेखक आहेत. त्यांचा जन्म २३ ऑक्टोबर १९७४ रोजी चेन्नई येथे झाला. त्यांचे बालपण कर्नाटकातील मंगळुरू येथे गेले. त्यांनी ऑस्ट्रेलियात शालेय शिक्षण घेतल्यानंतर अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात इंग्रजी साहित्याचे शिक्षण घेतले. पुढे त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातही शिक्षण पूर्ण केले.शिक्षणानंतर अरविंद अडिगा यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली. त्यांनी फायनान्शियल टाइम्स, मनी आणि टाइम यांसारख्या प्रकाशनांसाठी पत्रकार म्हणून काम केले. पत्रकारितेदरम्यान त्यांनी अर्थव्यवस्था, राजकारण, व्यवसाय आणि सामाजिक परिस्थिती यांचा अभ्यास केला. या अनुभवांचा प्रभाव त्यांच्या साहित्यावरही दिसून येतो.२००८ मध्ये अरविंद अडिगा



यांची द व्हाइट टायगर ही पहिली कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीत भारतातील गरीब कुटुंबातून आलेल्या बलराम हलवाई या तरुणाची कथा मांडण्यात आली आहे. गरिबी, सामाजिक विषमता, भ्रष्टाचार आणि यश मिळविण्यासाठी करावा लागणारा संघर्ष हे या कादंबरीचे प्रमुख विषय आहेत. या कादंबरीला २००८ मध्ये प्रतिष्ठेचा बुकर पुरस्कार मिळाला. त्यामुळे अरविंद अडिगा यांना आंतरराष्ट्रीय साहित्यविश्वात विशेष ओळख मिळाली.त्यांच्या इतर महत्त्वाच्या साहित्यकृतींमध्ये बिटवीन द असॅसिनेशन्स, लास्ट मॅन इन टॉवर, सिलेक्शन डे आणि ॲम्नेस्टी या कादंबऱ्यांचा समावेश होतो. त्यांच्या लेखनात भारतीय समाजातील आर्थिक विषमता, शहरी जीवनातील संघर्ष, मानवी महत्त्वाकांक्षा आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीचे वास्तववादी चित्रण आढळते.अरविंद अडिगा यांच्या लेखनाची विशेषता म्हणजे ते सामान्य माणसाच्या जीवनातील संघर्ष आणि समाजातील विसंगती प्रभावीपणे मांडतात. त्यांच्या साहित्यामुळे भारतीय समाजातील विविध प्रश्न जागतिक वाचकांसमोर पोहोचले आहेत.पत्रकारिता आणि साहित्य या दोन्ही क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणारे अरविंद अडिगा हे समकालीन भारतीय इंग्रजी साहित्यामधील महत्त्वाचे लेखक आहेत. २००८ मध्ये बुकर पुरस्कार मिळविणारी त्यांची 'द व्हाइट टायगर' ही कादंबरी त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीतील सर्वांत महत्त्वाची उपलब्धी मानली जाते. अरविंद अडिगा हे भारतीय पत्रकार आणि प्रसिद्ध इंग्रजी साहित्यिक आहेत. त्यांच्या लेखनातून भारतीय समाजातील आर्थिक विषमता, गरिबी, भ्रष्टाचार, सामाजिक भेदभाव आणि श्रीमंत-गरीब यांच्यातील दरी यांचे वास्तव प्रभावीपणे मांडले जाते. त्यांच्या साहित्यामध्ये सामान्य माणसाचे जीवन, त्याच्याआकांक्षा आणि समाजव्यवस्थेतील विरोधाभास यांचे चित्रण पाहायला मिळते.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

प्रवरा नदीच्या बंधाऱ्यात दोघे बुडाले

एकाचा मृत्यू, दुसरा बेपत्ता ! भावाला वाचवण्यासाठी मोठ्या भावाची नदीत उडी



अकोले (प्रतिनिधी)

अकोले तालुक्यातील सुगाव बुद्रुक शिवारातील प्रवरा नदीपात्रावरील बंधाऱ्यात दोघे बुडाल्याची धक्कादायक घटना गुरुवारी दुपारी एक ते दीड वाजण्याच्या सुमारास घडली. पाण्यात बुडणाऱ्या एका व्यक्तीला वाचवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांत दोन तरुण पाण्यात बुडाले. या दुर्घटनेत बाळू अनिल शिंदे (वय ३८, रा. शाहूनगर) यांचा मृतदेह शोधण्यात यश आले असून, त्यांना वाचवण्यासाठी नदीत उतरलेला आकाश पोपट पथवे (वय २५, रा. देवठाण) हा तरुण अद्याप बेपत्ता आहे. त्याचा शोध घेण्यासाठी प्रशासन आणि स्थानिक नागरिकांकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू होते. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी बाळू अनिल शिंदे हे सुगाव बुद्रुक शिवारातील प्रवरा नदीवरील बंधाऱ्याजवळ पोहण्यासाठी गेले होते. पाण्यात उतरले असताना ते बुडू लागले. हा प्रकार पाहून सुगाव येथे आपल्या बहिणीकडे आलेल्या देवठाण येथील सुरज पथवे यांनी त्यांना वाचवण्यासाठी नदीत उडी घेतली. मात्र, पाण्याच्या वेगवान प्रवाहामुळे सुरज यांनाही अडचणींचा सामना करावा लागला.

दरम्यान, आपला भाऊ पाण्यात बुडत असल्याचे लक्षात येताच आकाश पोपट पथवे यांनीही नदीत उडी घेतली. या प्रयत्नात सुरज यांचा जीव वाचला; मात्र बाळू शिंदे यांना वाचवण्याचा प्रयत्न करताना आकाश हे पाण्यात बुडाले. त्यानंतर आकाश यांचा शोध सुरू करण्यात आला. मात्र, नदीतील पाण्याचा वेग आणि वाढलेली पाणीपातळी यामुळे शोधकार्यात अडथळे निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने तसेच ड्रोन कॅमेऱ्यांचा वापर करून शोधमोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान बाळू शिंदे यांचा मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. मात्र, आकाश पथवे यांचा शोध उशिरापर्यंत सुरू होता. सध्या प्रवरा नदीपात्रातून पिण्याच्या पाण्याचे आवर्तन सुरू असल्याने नदी दुथडी भरून वाहत आहे. पाण्याचा वेग आणि प्रवाहाची तीव्रता यामुळे बेपत्ता तरुणाचा शोध घेणे आव्हानात्मक ठरत आहे.

सुगाव बुद्रुक परिसरात यापूर्वीही नदीपात्रातील दुर्घटनेने मोठी हळहळ व्यक्त झाली होती. २२ मे २०२४ रोजी गावाच्या पूर्वेकडील परिसरातील बंधाऱ्यावर दोन मुले बुडाली होती. त्यांचा शोध घेण्यासाठी आलेल्या राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एसडीआरएफ) पाणबोटीला अपघात होऊन ती उलटली होती. या दुर्घटनेत तीन जवान शहीद झाले होते, तर एका स्थानिक व्यक्तीचाही मृत्यू झाला होता.

या जुन्या दुर्घटनेच्या जखमा अद्याप ताज्या असतानाच सुगाव बुद्रुक शिवारात पुन्हा घडलेल्या या घटनेने परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नदीपात्रातील वाढता पाण्याचा प्रवाह आणि बंधाऱ्यांवरील संभाव्य धोके लक्षात घेता नागरिकांनी पाण्यात उतरताना विशेष खबरदारी घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

जिल्हा बँक निवडणुकीत राजकीय प्रतिष्ठेची लढाई

विखे-थोरातांचे सहकार विकास पॅनेल विरुद्ध लंके-लोखंडेंचे सहकार परिवर्तन

युवावावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीने जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सहकाराच्या माध्यमातून जिल्ह्यावरील राजकीय वर्चस्व सिद्ध करण्यासाठी दिग्गज नेत्यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली असून, बिनविरोध निवडींच्या प्रक्रियेनंतर उर्वरित जागांसाठी राजकीय डावपेचांना वेग आला आहे. बँकेच्या २१ संचालकांपैकी ११ जागा बिनविरोध झाल्या असून, उर्वरित १० जागांसाठी २७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे ही निवडणूक केवळ संचालक निवडीची न राहता जिल्ह्यातील आगामी राजकीय समीकरणांची दिशा ठरवणारी प्रतिष्ठेची लढत बनली आहे.

तीन पॅनेलमध्ये रंगणार सत्तासंघर्ष

या निवडणुकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या एकत्रित राजकीय ताकदीचे 'सहकार विकास पॅनेल' (कपबशी), खासदार नीलेश लंके व माजी खासदार सदाशिव लोखंडे यांच्या नेतृत्वाखालील 'सहकार परिवर्तन पॅनेल' (छत्री) आणि विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र तिसरी आघाडी (शिट्टी) यांच्यात प्रमुख लढत होत आहे. विखे-थोरात यांच्या एकत्रित ताकदीला आव्हान देण्याची भूमिका लंके यांनी घेतली असताना, राम शिंदे यांच्या स्वतंत्र आघाडीमुळे निवडणुकीतील चुरस आणखी वाढली आहे. शिंदे यांच्या पॅनेलचा एक उमेदवार बिनविरोध निवडून आला असून, त्यांचे उर्वरित तीन उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे प्रमुख नेत्यांच्या रणनीतीबरोबरच स्थानिक पातळीवरील गटबाजी आणि मतदारांचे गणितही निर्णायक ठरणार आहे.

बिनविरोध निवडीवरून राम शिंदे नाराज

बिनविरोध निवडणुकीच्या प्रक्रियेत आपल्याला डावलण्यात आल्याचा आरोप करत सभापती प्रा. राम शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांची बैठक घेऊन अंतिम पॅनेल निश्चित करण्याची जबाबदारी विखे यांच्यावर सोपवण्यात आली होती. मात्र, आपण दोन पावले मागे येण्याची भूमिका घेतल्यानंतरही मंजुषा गुंड आणि आदिनाथ हजारे यांना पॅनेलमध्ये स्थान मिळाले नाही, असा दावा शिंदे यांनी केला. त्यामुळे स्वतंत्र पॅनेल उभे करण्याचा निर्णय

राम शिंदेंच्या स्वतंत्र आघाडीने वाढवली चुरस



दरम्यान, माघारीच्या अखेरच्या टप्प्यात श्रीगोंद्यातून दत्तात्रय पानसरे आणि जामखेडमधून सचिन घुमरे यांची बिनविरोध निवड झाल्याने उर्वरित जागांवरील लढतींकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

सोसायट्यांपासून राखीव जागांपर्यंत चुरस

उर्वरित १० जागांवर वेगवेगळ्या मतदारसंघांत प्रतिष्ठेच्या लढती होत आहेत. शेतीपूरक मतदारसंघात आमदार आशुतोष काळे यांच्यासमोर सुधीर म्हस्के यांचे आव्हान आहे. पारनेर सोसायटी मतदारसंघात खासदार नीलेश लंके आणि राहुल शिंदे यांच्यात सामना रंगणार आहे. राहुरी सोसायटी मतदारसंघात आमदार प्राजक्त तनपुरे यांच्याविरुद्ध सत्यजित कदम निवडणूक लढवत आहेत.

अकोले आणि कर्जत सोसायटी मतदारसंघांत प्रमुख पॅनेलला अधिकृत उमेदवार देता न आल्याने अपक्ष उमेदवारांमधील चुरस वाढली आहे. अकोले मतदारसंघात आमदार डॉ. किरण लहामटे आणि संजीवनी शिंदे यांच्यासह चार उमेदवार रिंगणात आहेत. कर्जत मतदारसंघात तुषार पिसाळ आणि ज्योती शिंदे यांच्यासह चार उमेदवारांमध्ये लढत होत आहे. अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघात माजी आमदार वैभव पिचड आणि प्रशांत लोखंडे यांच्यात थेट सामना आहे. इतर मागासवर्गीय (ओबीसी) मतदारसंघात शिवदास गुंजाळ, कारभारी जावळे, जालिंदर वाकचौरे, कडुचंद शेटे आणि आदिनाथ हजारे यांच्यात पंचरंगी लढत होत आहे. भटके-विमुक्त प्रवर्गात सुभाष गिते, ऋषिकेश ढाकणे आणि गणपतराव सांगळे यांच्यात सामना रंगणार आहे.

महिला राखीव प्रवर्गातील दोन मंजुषा गुंड, अनुराधा नागवडे, सुवर्णा पाचपुते, संध्या महांडळे आणि संगीता वाघ अशा सात उमेदवारांनी दंड थोपटले आहेत. त्यामुळे या मतदारसंघातील निकालही लक्षवेधी ठरण्याची शक्यता आहे.

मतदान प्रक्रियेच्या पारदर्शकतेचा मुद्दा ऐरणीवर

चिन्हवाटपाच्या वेळी खासदार नीलेश लंके आणि माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कामकाजावर आक्षेप घेतला. माघारीची मुदत संपल्यानंतरही प्रक्रिया सुरू असल्याचा आरोप करत त्यांनी मतदान केंद्रांवरील प्रक्रिया तसेच मतपेट्यांच्या वाहतुकीचे संपूर्ण व्हिडिओ चित्रीकरण करण्याची मागणी केली. त्यामुळे राजकीय संघर्षाबरोबरच निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेचाही मुद्दा चर्चेत आला आहे.

निकालाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष

सुमारे साडेतीन हजार प्रतिनिधी मतदार जिल्हा बँकेच्या सत्तेचे भवितव्य ठरवणार आहेत. विखे-थोरात यांची एकत्रित रणनीती कितपत यशस्वी ठरते, लंके-लोखंडे यांचे सहकार परिवर्तन पॅनेल किती प्रभाव पाडते आणि राम शिंदे यांची स्वतंत्र आघाडी कोणती राजकीय समीकरणे बदलते, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

सहकाराच्या या राजकीय रणांगणात नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली असली, तरी शेतकऱ्यांचे कर्जप्रश्न, सोसायट्यांचे सक्षमीकरण आणि ठेवीदारांच्या पैशांची सुरक्षितता हे बँकेच्या कामकाजातील मूलभूत प्रश्नही तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यामुळे जिल्हा बँकेच्या सत्तेची सूत्रे कोणाच्या हाती जातात, यासोबतच नवी संचालक मंडळी सहकाराच्या मूळ उद्दिष्टांना कितपत न्याय देतात, याकडेही सभासद आणि ठेवीदारांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरून

कथित ऑडिओ...

हे सुप्रियाताईंनी मला जरूर पाठवून द्यावे. म्हणजे तो स्पाय पेन काय असतो आणि नेमके काय चालले आहे, हे मी निश्चितपणे समजून घेईन. मतदान प्रक्रियेबाबत बोलताना त्यांनी समाधान व्यक्त केले. लोकांमध्ये मतदानाचा मोठा उत्साह दिसत असून जनरल इलेक्शनसारखा रिस्पॉन्स आहे. विधानपरिषद हे ज्येष्ठांचे सभागृह आहे, त्यामुळे सर्व पदवीधर आणि शिक्षकांनी जास्तीत जास्त मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले. नागपूर पदवीधर मतदारसंघाबद्दलच्या आठवणींना उजाळा देताना ते म्हणाले, ५७ वर्षांपूर्वीची ही जागा गमावली होती, त्याचे एक शल्य होते. माझे वडील सुद्धा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत होते, ही एक वेगळी आठवण आहे. यावेळेस मात्र सकारात्मक वातावरण दिसत असून योग्य तोच निकाल लागेल.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड , तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
हेल्थ इंडिया इन्शुरन्स
FHPL हेल्थ इन्शुरन्स
इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
बजाज आलियांज इन्शुरन्स
एसबीआय जनरल इन्शुरन्स
ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
मेडसेव टीपीए प्रा.लि.
जेनिन्स इंडिया टीपीए लि.
ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
टाटा एआयजी इन्शुरन्स
रिलायन्स जनरल इन्शुरन्स
मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
नॅशनल इन्शुरन्स कं.
न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
युनायटेड हेल्थकेअर लि.
Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
एम.डी.इंडिया हेल्थकेअर
विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग: अतिदक्षता विभाग • अपघात विभाग
डायलिसीस विभाग: सुपर स्पेशालिटी विभाग • न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग: मेडिसीन विभाग • अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट: स्पाईन सर्जरी • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25